

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

- वर्ष – पंधरावे
- अंक ४ था
- १ जुलै २०२५

# पक्षिमित्र

रजि.नं.महा.२८५/९८/ नागपूर

संपादक : किरण मोरे




पहिल्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनात श्री. मारुती चितमपल्ली भाषण देतांना.




नागपूर येथे पार पडलेल्या १२ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात श्री माधवराव पाटील डोंगरवार यांच्या उपस्थितीत श्री. मारुती चितमपल्ली पुस्तकाचे अनावरण करताना.



सोलापूर येथे जानेवारी १९९७ रोजी विहंग मंडळाने आयोजित केलेल्या १६ व्या पक्षिमित्र संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी मारुती चितमपल्ली सह निनाद शहा, रमेश लाडखेडकर, प्रवीणसिंह परदेशी, मनेका गांधी, दिलीप यार्दी आदी.



पक्षीतज्ञ श्री मारूती चितमपल्ली व अरण्यपूत्र श्री माधवराव (पाटील) डोंगरवार बोदराई देवस्थान येथे



अमरावती येथिल २६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन २०१३ चे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करतांना श्री. मारुती चितमपल्ली



२६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन २०१३ मध्ये श्री. मारुती चितमपल्ली यांना छायाचित्र प्रदर्शनी दाखवताना प्रा. डॉ. गजानन वाघ .



अरण्यऋषी आदरणीय मारूती चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करतांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



श्री मारूती चितमपल्ली यांना महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेच्यावतीने पक्षी सप्ताहसंबंधी शासन निर्णय प्रत देतांना निनाद शहा आणि विहंगीयन्स

संपादक

**श्री. किरण मोरे**

विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड, मनोर मांगल्य जवळ,
अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९९००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

मार्गदर्शक

**डॉ. निनाद शहा** सोलापूर **श्री. अविनाश कुबल** ठाणे

## कार्यकारिणी

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>मो. ९८५०२९९३२४ |
| कार्यवाह | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| संघटक | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सहसंघटक | **श्री. अविनाश कुबल,** ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सहकार्यवाह | **श्री. निनाद शहा,** सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | **सौ. रूपाली सरोज,** रेवदंडा<br>मो. ९८६९५५९९२२ |
| सदस्य | **श्री. माणिक पुरी,** परभणी<br>मो. ९८८१९६७३४६ |
| सदस्य | **श्री. नितीन मराठे,** नागपूर<br>मो. ९४२११८९३३३ |
| सदस्य | **श्री. अमोल सावंत,** अकोला<br>मो. ९८२२७२८८२३ |

## सल्लागार मंडळ

श्री. भाऊ काटदरे (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
श्री. दिगंबर गाडगीळ (पूणे) मो. ९८८१०७९७११
डॉ. दिलीप यार्दी (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
डॉ. अनिल पिंपळापुरे (नागपुर) मो. ९८८१७१३४६६
श्री. बापुसाहेब भोसले (अहमदनगर) मो.९८२२६३३१३३
श्री. राजु कसंबे (मुंबई) मो.९००४९२४७३१



# संपादकीय...

अमरावती मधील वेक्स (WECS) ह्या संस्थेने २०१३ मध्ये २६ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आयोजित केले होते. त्यात मारुती चित्तमपल्ली सर हे संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभले. त्यांची पुस्तके वाचून मला निसर्गाची ओढ लागली होती. त्यांना भेटणे हा स्वर्गीय आनंदच होता. या संमेलनात छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनातील फोटो बघताना चितमपल्ली सरांची पहिली भेट झाली. 'कारुण्यकोकीळ'च्या पिल्लाला 'जांभळ्या पुठ्ठ्याचा सूर्यपक्षी (शिंजीर)' या पक्ष्याची नर-मादी घास भरवतात असे ते दृश्य होते. चित्तमपल्ली सर त्या फोटोजवळ घुटमळले. त्यांनी मोठ्या बारकाईने त्याचे निरीक्षण केले. मी म्हटले, सर, ही एवढी मोठी कोकिळेची मादी या सूर्यपक्षाच्या टांगत्या घरट्यात अंडी द्यायला कशी बसत असेल? सर हसले. तू याचे आणखी निरीक्षण करायला हवे. अंडी देण्यासाठी कशी बसत असेल या तुझ्या प्रश्नापेक्षा महत्त्वाचे आहे ती कोकिळा सनबर्डचे घरटे टांगत्या स्वरूपात असूनही त्यांच्या घरट्याची निवड का करते? केवळ फोटोग्राफी करणाऱ्या माझ्या डोक्यात अभ्यासाचा किडा सोडून सर तिथून निघून गेले. त्यानंतर झालेल्या भेटीमध्ये निरीक्षण आणि अभ्यास या बाबींवरच त्यांनी चर्चा केली. माझ्यासारख्या कित्येकजणांना प्राणी, पक्षी आणि निसर्गाची गोडी त्यांनी लावली. आजही तितकीच लोकप्रिय आणि खूप विक्री असलेली त्यांची पुस्तके याचे प्रमाण आहेत. एकप्रकारे चितमपल्ली सरांनी नेहमी निसर्ग आणि पक्ष्यांवरील पुस्तकांना वलयांकित ठेवले. आता ही जबाबदारी निसर्गप्रेमींच्या पुढल्या पिढीकडे हस्तांतरीत करून सर अनंतात विलीन झाले. त्यांच्या जाण्याने निसर्ग-अभ्यास विश्वात एक पोकळी तयार झाली; हे मात्र खरे. महाराष्ट्र पक्षीमित्रच्या पहिल्या संमेलनापासून सरांची उपस्थिती होती. संस्थेच्या सुरुवातीच्या जडणघडणीमध्ये त्यांची मुख्य भूमिका राहिली आहे. विदर्भातील जंगले सरांना विशेष प्रिय! त्यामुळे त्यांच्या पस्तीस वर्षांच्या वनविभागाच्या कारकिर्दीमध्ये तब्बल तीस वर्षे विदर्भातली आहेत. पहिल्या विदर्भ पक्षीमित्र संमेलनाचे ते उद्घाटकही होते. आता अमरावतीमध्ये होणाऱ्या ३७ व्या पक्षीमित्र संमेलनामध्ये त्यांची उणीव अधिक प्रखरतेने जाणवणार.

मारुती चितमपल्ली सरांचे कार्य आणि पक्षीअभ्यासकांचा त्यांनी तयार केलेला गोतावळा याचा छोटासा आढावा ऋणानुबंध या लेखात महाराष्ट्रातील शेवगाव संमेलनात अध्यक्ष असलेले डॉ. अनिल माळी ह्यांनी घेतला आहे. तेलंगणामधील वारंगल येथे स्परविंग लॅपविंग हा पक्षी आढळून आला. भारतातील ही प्रथमच नोंद! या टिटवीचे निरीक्षण करण्याकरीता'महाराष्ट्र पक्षीमित्र'चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर वारंगल येथे जाऊन आले. 'सीमारेषेच्या पलीकडे' या लेखात त्यांनी निरीक्षणादरम्यान आलेला अनुभव सांगितला आहे. पक्षीसंशोधक डॉ. राजू कसंबे यांनी आक्षी बीचवरील सागरी पक्ष्यांचे निरीक्षण 'कोविड, केक, करी' या लेखात मजेशीर ढंगाने कथन केले आहे. बुद्धपोर्णिमेला मचाणावरून होणाऱ्या प्राणीगणनेत विविध प्रकारचे पक्षीही दिसतात. पाणवठ्यावरील पक्ष्यांच्या नोंदीचा आढावा डॉ. प्रमोद वाठोरे यांनी 'मचाणावरची पाखरे' या लेखात घेतला. चंडोल प्रजाती आपली ओळख आणि सद्यस्थिती स्वत:च्या तोंडून कसे सांगेल, हे 'अरे आवाज कुणाचा?' या माझ्या लेखात वाचकांना वाचायला मिळेल. 'छायाचित्राची गोष्ट' या सदरामध्ये प्रशांत निकम यांनी वेडा राघू व फुलपाखराच्या छायाचित्रणा मागील कहाणी सांगितली आहे. तसेच, श्री वामनाचार्य गेल्या तेरा वर्षापासून नियमितपणे पक्षिमित्र अंकात 'टपाल तिकीटांच्या दुनियेत' हे सदर लिहितात. या सदराद्वारे आपल्याला पक्ष्यांच्या देश विदेशातील पोस्टल तिकिटांची माहिती वाचावयास मिळते. या अंकात त्यांनी मुनिया या पक्ष्याची माहिती आपल्या समोर सादर केली आहे. भारतातील पक्षीविश्वाचे सखोल संशोधन करून ते जागतिक स्तरावर पोहचविणारे अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या विविध आठवणींचा उजाळा देणारा हा अंक सर्वांच्या पसंतीस पडेल यात मुळीच शंका नाही.

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

नमस्कार,

जो माणूस वनात रमतो । चाफा त्याच्या मनात फुलतो ।।

हा संदेश देणारे 'अरण्यऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली' आज आपल्यात नाहीत. निवृत्त वनाधिकारी, निसर्गलेखक व महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे दि. १८ जून रोजी सोलापूर येथे वयाच्या ९३ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्र पक्षिमित्रची अपरिमित हानी झाली आहे.

एप्रिल महिन्यात पक्षिमित्रचे मार्गदर्शक आ. मारुती चितमपल्ली यांनी महामहीम राष्ट्रपतींच्या हस्ते 'पद्मश्री' पुरस्कार स्वीकारला तेव्हापासून महाराष्ट्र पक्षिमित्र कार्यकारिणी तर्फे सोलापूर येथे सरांचे अभिनंदन करण्यासाठी जाण्याचे ठरले होते. परंतु,दिनांक काही ठरला नाही. नेमके दि. १८ जूनला मी पुन्हा ग्रुप वर मेसेज टाकून या महिन्याच्या शेवटच्या रविवारी दि. २९ ला सोलापूरला जाण्याचे ठरू शकते काअशी विचारणा केली. आमचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य प्रा.डॉ. निनाद शहा सर सोलापूर येथेच असल्याने त्यांना विचारून तारीख निश्चित करण्यासाठी त्यांना सायंकाळी फोन करतो, असेही सांगितले. सायंकाळी शहा सरांचा फोन आला. फोन उचलला, आता भेट शक्य नाही, अशी सुरुवात करून चितमपल्ली सर आताच गेलेत अशी माहिती सरांनी पुरविली. पद्मश्री मिळाल्यावर आम्हाला चितमपल्ली सरांचे अभिनंदन करायचे होते ते अखेर राहूनच गेले.

मारुती भुजंगराव चितमपल्ली (०५ नोव्हेंबर १९३२ –१८ जून २०२५) हे भारतीय निसर्गअभ्यासक, वन्यजीव संरक्षक आणि मराठी भाषा लेखक होते. त्यांना 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जायचे. त्यांनी मराठी साहित्यात आणि वन्यजीव संरक्षणात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०२५ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. त्यांना 'पद्मश्री'जो मिळाला आहे. तो त्यांच्या साहित्य आणि पर्यावरणशिक्षण या क्षेत्रातील अतुलनीय, अशा कार्यासाठी! त्यानंतर अवघ्या दीड महिन्यात चितमपल्ली सर निसर्गात विलीन झाले. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या निधनाने भारतातील जंगलांशी नाळ जुळलेले एक निसर्गप्रेमी अभ्यासू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. निसर्गसंशोधन, लेखन आणि संवर्धनासाठी तब्बल पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी समर्पित केला.

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेसोबत मारुती चितमपल्ली यांचे अगदी चळवळीच्या सुरुवातीपासून, म्हणजे १९८१ पासुन ऋणानुबंध होते. ते लोणावळा येथे पार पडलेल्या पहिल्या संमेलनास उपस्थित होते. त्यानंतर ते वर्ष १९८३ च्या पहिल्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनास उद्घाटक म्हणूनही लाभले होते. नाशिकच्या १९८५ ला पार पडलेल्या सहाव्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष होते. विशेष म्हणजे या संमेलनाचे उद्घाटक प्रसिद्ध साहित्यिक वि. वा. शिरवाडकर होते. अमरावती येथे पार पडलेल्या २६व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनास ते उद्घाटक म्हणून लाभले आणि संपूर्ण दोन दिवस थांबून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक पक्षिमित्रांशी त्यावेळी संवाद साधला होता. २०२० यावर्षी महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे त्यांना जीवन–गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिवस ५ नोव्हेंबर आणि जगप्रसिद्ध पक्षीसंशोधक डॉ. सालिम अली यांचा जन्मदिवस १२ नोव्हेंबर! हा योग साधून महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे ५ ते १२ नोव्हेंबर हा पक्षीसप्ताह साजरा करण्याची २०१७ पासून सुरुवात केली होती पुढे महाराष्ट्र शासनाने हा पक्षीसप्ताह शासन स्तरावर साजरा करावा, यासाठी पक्षिमित्रतर्फे पाठपुरावा करण्यात आला. २०२०ला हा प्रस्ताव शासनाने मंजूर केला. महाराष्ट्र पक्षिमित्रची ही एक मोठी उपलब्धी आहे. सरकारने नुकताच त्यांचा 'पद्मश्री' पुरस्कार देऊन सन्मान केला तो दिवस महाराष्ट्र पक्षिमित्रसाठी अभिमानाचा दिवस होता. मारुती चितमपल्ली यांची पुस्तके वाचून आमच्या पिढीतील अनेकजण जंगल आणि पक्षी–अभ्यास व संवर्धनाकडे वळले आहेत. शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचे आम्हाला मार्गदर्शन मिळाले. पक्षीकोषचे काम सुरू असल्यापासून मी त्यांच्या संपर्कात होतो. एखाद्या नवीन माहितीसाठी किंवा छायाचित्रांसाठी त्यांचा फोन यायचा. नागपूर आणि वर्धा येथे असतांना आमची वारंवार भेट होत असे. महाराष्ट्र पक्षिमित्र त्यांचा सदैव ऋणी राहील. महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे अरण्यऋषी श्री. मारुती चितमपल्ली ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

खरं तर,मे आणि जून या महिन्यातील अवघ्या २५ दिवसाच्या कालावधीत वन्यजीव क्षेत्रातील काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या, निधनाच्या एकामागून एक आलेल्या बातम्या धक्कादायक अश्याच होत्या.

२४ मे रोजी राजस्थानातील जैसलमेरजवळ झालेल्या एका भीषण अपघातात ४ लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये, राधेशाम पेमाणी बिष्णोई या तरुणाचे नाव ऐकून पक्षीक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेकांना धक्का बसला. हा तरुण जैसलमेर भागात विशेषतः माळढोक-संवर्धनासाठी एक स्वयंसेवक म्हणून कार्य करीत होता. त्याला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून तो इतर सहकारी व वन विभागाचे कर्मचारी यांना घेऊन वन विभागाच्या गाडीने शिकाऱ्यांचा पाठलाग करण्यास निघाला असता, त्या गाडीची ट्रक सोबत धडक होऊन गाडीतील चौघांचाही मृत्यू झाला. ही अतिशय दुर्दैवी व दुःखद अशी घटना होती. पुढे, अवघ्या ४ दिवसानंतर मुंबईत गेली अनेक दशके पक्षी-अभ्यास, संशोधन व जनजागृती यासाठी सातत्याने कार्य करणारे संजय मोंगा यांचे दुःखद निधन झाले. ते गेले काही दिवस कॅन्सरच्या आजाराशी लढत होते. त्यानंतर पुन्हा तीनच दिवसांनी भारतातील प्रसिद्ध असे वाघ-संवर्धक, लेखक, टायगर मॅन श्री.वाल्मिक थापर यांचेसुद्धा दुःखद निधन झाले. त्यांचे 'लँड ऑफ टायगर' हे पुस्तक आणि बी.बी.सी ने, याच नावाने केलेली टीव्ही मालिका, यामुळे सर्वांना ते परिचित होते. ह्या सर्वांना 'महाराष्ट्र पक्षिमित्र'तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण!

आता पुढील संमेलनाविषयी, पुढील ३७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन माझ्या गावात अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या (WECS) यजमान पदाखाली येत्या नोव्हेंबरमध्ये, दिवाळीनंतर दहा दिवसांनी, म्हणजे १ व २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणार आहे. आमच्या WECS संस्थेचे यावर्षी रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने आम्ही हे संमेलन अमरावती येथे घेण्यासाठी उत्सुक होतो. यापूर्वी याच संस्थेने २०१३ यावर्षी २६ व्या संमेलनाचे यशस्वी आयोजन केले होते. विशेष म्हणजे या संमेलनात स्वतः स्व. मारुती चितमपल्ली सर उपस्थित होते. त्यामुळे या संमेलनात त्यांच्या आठवणी जाग्या झाल्यावाचून रहाणार नाहीत. यावर्षीचे संमेलन भव्य व अविस्मरणीय करण्याचा आमचा मानस आहे. हे संमेलन अखिल भारतीय व्हावे, हा देखील प्रयत्न राहील. या संमेलनास जोडून काही कार्यशाळा व विविध स्पर्धांचेसुद्धा आयोजन केले जाणार आहे. यास्तव, अमरावतीला येण्याचे नियोजन करा, आम्ही आपल्या स्वागतास उत्सुक आहोत.

**मिळून सारे जण । करू द्विजगण रक्षण ।।**

*****






# मारुती चितमपल्ली



**अविनाश कुबल**
सहसंघटक,महाराष्ट्र पक्षिमित्र




सर्व वन अधिकाऱ्याना काम करत असताना त्यांच्या वनसेवे अशाचा भाग म्हणून सातत्याने अरण्य वाचन करणे अनिवार्यच असते. वनसेवेसाठी शिक्षण घेत असताना सोबतच अरण्य वाचनाचे धडे आपसूकच दिले जात असतात. त्या शिवाय वन अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होतच नसल्याने हे सर्व शिकवूनच त्यांना वन सेवेसाठी तयार केले जाते. स्वत: वनसेवेत असताना असे अरण्यवाचना सोबत आलेले वेगवेगळे अनुभव शब्दबद्ध करून वाचकांकरिता वनातील ज्ञानाचा खजिना उघड करून देणारे डॉक्टर मारुती चित्तमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवान्वित केले आहे. वन, वन्य प्राणी आणि खास करून पक्षीजीवन विषयक ज्ञानाचा खजिना उघड करून त्याद्वारे त्यांनी केलेली साहित्याची सेवा ही केवळ डॉक्युमेंटेशन स्वरूपातली नसून मराठी भाषेच्या रसास्वादनाच्या दृष्टीने तो एक अमूल्य ठेवा आहे. आधुनिक काळातील शास्त्र आणि तंत्रज्ञानाची भरीव पार्श्वभूमी असलेले अरण्यवाचनाला प्राचीन भारतातील अरण्य-वाचन संकल्पनेची त्याला जोड देण्यासाठी खास संस्कृत भाषेचा अभ्यास करून त्यावर पुरेसे प्रभुत्व प्राप्त करून त्यांनी त्या विषयातली आपली पकड अत्यंत मजबूत केली. वन अधिकारी म्हणून श्री चित्तमपल्ली ह्यांची बदली महाराष्ट्राच्या विविध प्रांतांमध्ये झाली. कधी विदर्भातील नवेगाव बांध परीसरातले पानगळीचे जंगल, तर कधी ढेबेवाडी (हे त्यांचे पहिल्या पोस्टिंग चे ठिकाण होते) येथील अत्यंत कमी पावसाच्या प्रदेशातील काटेरी वृक्ष असलेली गवताची माळराने, कधी नागझिऱ्याचे समृद्ध असे साग, बांबूचे जंगल, तर कधी अती पावसाचे प्रमाण असलेले रायगड मधले कर्नाळा पक्षी अभयारण्यासारखे निम्न सदाहरित वन, अशा विविध प्रकारच्या जंगलांच्या वेगवेगळ्या अनुभवातून ते सतत शिकत राहिले. प्रत्येक ठिकाणी आपली सेवा बजावत असताना त्यांना आलेले अनुभव यांनी नोंदून ठेवले. त्यापैकी कर्नाळा अभयारण्यात नेमणूक असताना त्यांची डॉ. सालीम अली यांच्याशी झालेली भेट त्यांच्या आयुष्याला खास कलाटणी देणारी ठरली. डॉ. सालीम अली मुंबईहुन निघून आपल्या कीहीम अलिबाग येथील घराकडे जात असताना वाटेत असलेल्या कर्नाळ्याला पक्ष्यांच्या निरीक्षणासाठी थांबायचे. त्यांच्या पक्ष्यांच्या निरीक्षणाकडे कुतूहल म्हणून पहाताना सोबतच पक्ष्यांच्या वर्तनाचा सखोल अभ्यास कसा करायचा हि कला त्यांनी डॉ सलीम अली ह्यांच्याकडून आत्मसात केली. पक्ष्यांच्या नोंदी कशा घ्यायच्या? त्या कशा नोंदून ठेवायच्या, पुन्हा तो त किंवा त्या प्रजातीचा पक्षी दिसला तर काय अभ्यास करायचा हे सर्व त्यांनी अनुभवले आणि आत्मसात केले. पुढे जाऊन आपण केलेल्या पक्षी निरिक्षणाच्या नोंदी आणि त्यावर आपल्या अनुभव आणि अतिरिक्त वाचनाच्या आधारे केलेले भाष्य यांच्या सुंदर मिलाफातून अनेक लेख आणि पुस्तके निर्माण झाली.



अशा प्रकारे निर्मिती झालेल्या लेखांचे संकलन करून त्यातून निर्माण झालेल्या ग्रंथ संपदेमुळे पुढे मराठी भाषेमध्ये अरण्याचे अनुभवांवर आधारित लिखाण सुरू झाले. त्यातून मराठी भाषेला अधिक समृद्धी प्राप्त झाली. अशाच प्रकारे अरण्य-वाचन, वन्यजीवन अनुभवावर आधारित अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. पक्षी जाय दिगंतरा (१९८३), जंगलाचं देणं (१९८५), रानवाटा (१९९१), शब्दांचे धन (१९९३), रातवा (१९९३), मृगपक्षीशास्त्र ९१९९३), घरट्यापलीकडे (१९९५), पाखरमाया (२०००), निसर्ग वाचन (२०००), सुवर्ण गरुड (२०००),

आपल्या भारतातील साप (२०००), आनंददायी बगळे (२०००), निळावंती (२०००), पक्षी कोश (२०००), चैत्र पालवी (२००४), केशराचा पाऊस (२००५), चकवा चांदण (२००५), जंगलाची दुनिया (२००६), नवेगाव बांधचे दिवस (२०१०) अशी पुस्तकांची एक भली मोठी यादी त्यांच्या नावासमोर जोडली गेली आहे. ह्या यादीतील अनेक पुस्तकांना साहित्य लेखनाचे विविध पुरस्कार प्राप्त झाले त्या शिवाय त्यांचे अनेक वेगवेगळ्या संस्थांनी त्यांचे गौरव सोहोळे आयोजित करून त्यांना बहुमान मिळवून दिले. समीक्षकांनी 'वनविद्येचे तत्त्वज्ञ ललित गद्यकार' अशा शब्दांत त्यांचा गौरव केला. तीन वेळा महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार, तर उत्कृष्ठ साहित्य लेखनाबद्दलचा महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१६), दमाणी साहित्य पुरस्कार (१९९१), अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचा सन्मान (१९९६), महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार (२००३), वसुंधरा सन्मान (२००९), भारती विद्यापीठ जीवनसाधना पुरस्कार (२०१३) असे अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले. महाराष्ट्र पक्षी-मित्र संस्थेच्या पहिल्या पक्षी-मित्र संमेलनाचे (१९८७ साली नासिक येथे झालेल्या) ते अध्यक्ष होते. तर त्यांच्या साहित्य लेखनकार्याचा गौरव २००६ साली सोलापूर येथे भरलेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊ करण्यात आले.



वनसेवेतून निवृत्तीच्या वेळी वर्ष १९९० मध्ये ते महाराष्ट्रातील सर्वप्रथम जाहीर झालेल्या आणि अत्यंत महत्वाच्या अशा मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे उप संचालक होते. निवृत्तीनंतर आयुष्याचा बराचसा काळ नागपूर मध्ये व्यतित केलेल्या डॉ. चित्तमपल्ली यांनी गेल्या काही वर्षापासून आपला मुक्काम त्यांचे होम डिस्ट्रिक्ट असलेल्या सोलापूर येथे हलविलेला होता. माळढोक ह्या अत्यंत दुर्मिळ झालेल्या गवताळ प्रदेशातील पक्ष्याच्या महाराष्ट्रातील अस्तित्वासाठी प्रसिद्ध अशा सोलापूर जवळच्या नान्नज पक्षी अभयारण्याच्या कार्यालय परिसरात त्यांच्या संशोधनात्मक आणि लिखाण कामासाठी आवश्यक जागा वनविभागाने त्यांना अत्यंत सन्मानपूर्वक उपलब्ध करून दिलेली होती. तेथे राहून हे अरण्यऋषि आपल्या संशोधन आणि लिखाणाचे कामात सतत व्यग्र होते. पक्षीकोश नंतर आता अगदी निकट भविष्यात त्यांचा प्राणीकोश हा ग्रंथ वाचकांच्या भेटीला येण्यासाठी तयार आहे. त्यानंतर सुद्धा काही नवनवीन विषयांवरचा त्यांचा सतत सुरू असलेल्या अभ्यासातून वृक्षकोश आणि मत्स्यकोश हे ग्रंथ आपल्या समोर येणार . वन अधिकारी म्हणून लाभलेली आणि प्रयत्नपुर्वक जोपासलेली सूक्ष्म निरीक्षणशक्ति, सतत चिकित्सक वृत्तीने संशोधन करत राहण्याचा स्वभाव, वाचनाची प्रचंड आवड तसेच पुस्तके आणि माणसे वाचण्याचा अनुभव हे त्यांचे गुण त्यांना ह्या क्षेत्रातील अन्योन्य स्थानी घेऊन गेले आहे. वनांचे, वनातील जैव वैविध्याचे, वन्यजीवांच्या परस्पर वर्तनाचे असे सर्व निरीक्षण आणि त्याबाबत त्यांनी केलेले लिखाण त्यांना अरण्यऋषि हे अत्यंत समर्पक आणि सार्थ नाव देऊन गेले आहे.






*****

# सीमारेषेच्या पलीकडे



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

नेहमीप्रमाणे पक्षीनिरीक्षणासाठी लागणारा कॅमेरा, बायनोक्युलर, पुस्तके, मोबाईल इत्यादी. साहित्य रात्रीच चार्ज वगैरे करून आम्ही सकाळी सातलाच आमच्या कार ने एक 'नवीनच,'पक्षी बघण्यासाठी निघालो. आजचे पक्षीनिरीक्षणाचे ठिकाण मात्र नेहमीच्या यादीतले नव्हते. एका विशिष्ट पक्ष्याला बघण्यासाठी आम्हाला पाचशे 'किलोमीटर'चा प्रवास करायचा होता. अमरावतीवरून यवतमाळ व पांढरकवडा ओलांडून आम्ही तेलंगणाला जाण्यासाठी हैदराबाद हायवेवर लागलो. पुढे आदिलाबादवरून नेहमीचा निर्मलमार्गे जाणारा हैदराबाद-हायवे सोडून आम्ही आदिलाबाद गावातून करिमनगर रस्त्याला लागलो.

पुढे तासाभरानंतर थोडे जंगल सुरू झाले. पांढरकवडा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलाला जोडणारा हा जंगलाचा भाग असावा अशी आमची चर्चा सुरू असतानाच जंगलाचा पोत एकदम बदलला! एका चांगल्या संरक्षित जंगलाचा भाग असावा अशा जंगलातून रस्ता जात होता. हे कुठलं संरक्षित जंगल,असा विचार करीत आम्ही, कुठे जंगलाच्या नावाची पाटी दिसते का ते बघू लागलो; अन् एका ठिकाणी रस्त्याच्या कडेला 'कावल व्याघ्र प्रकल्प, कोअर एरिया, जन्नाराम विभाग' असा मोठा नामफलक दिसला. साहजिकच आम्ही थोडं थांबलो, आठवणीसाठी एक फोटो काढला. तेलंगणातील कावल व्याघ्र प्रकल्पाचं नाव ऐकून होतो; परंतु हा पांढरकवडा-टिपेश्वरपासून इतक्या जवळ असेल असा विचार कधी केला नव्हता. करीम नगरला पोहोचता-पोहोचता दुपार झाली. येथेच जेवण उरकून पुढे जायचे ठरले. या लहान गावात जे मिळेल ते पोटात टाकावे, असा विचार करून एका ठिकाणी थांबलो. मात्र, 'मियाँ ने' चांगले जेवू घातले. अपेक्षेपेक्षा कमी आलेले बिल अदा करून पुढील प्रवासास लागलो.

तेलंगणा राज्यातील वारंगल शहराजवळ पोहोचता-पोहोचता पाच वाजले. इतक्यात आमची वाट बघत असलेले माझे मित्र वारंगल येथील पक्षीअभ्यासक-छायाचित्रकार श्री. इंद्राम नागेश्वर राव यांचा फोन आला. 'आता उशीर झाला असल्याने तुम्ही तलावावर न जाता येथे मुक्काम करावा, सकाळी आपण मिळून तलावावर जाऊ, आता तुम्ही हॉटेलवर पोहोचा, मी पण पोहोचतो' असा त्यांनी सल्ला दिला. फोन ठेऊन आम्ही थोडा विचार केला, घड्याळात बघितले, जेमतेम पाचच वाजले होते. दिवस उन्हाळ्याचे असल्याने सूर्य उशिरा मावळणार होता. इंद्राम ह्यांनी पाठविलेल्या गुगल-मॅप नुसार तलाव जेमतेम १५ किमी अंतरावर होता. शहर ओलांडून गेलो तरी जेमतेम १५ मिनिटे लागणार होती. इंद्राम यांना न सांगता 'गुगल बाबाच्या' मदतीने आम्ही गाडी थेट अम्मावरीपेटा तलावाकडे वळवली आणि अवघ्या १० मिनिटात तलावावर पोहोचलो.

भारतात आढळणाऱ्या नदी टिटवी (River Lapwing) प्रमाणे दिसणारी; परंतु आफ्रिका व युरोपीय देशांमधे आढळून येणारी Spur-winged lapwing dmSpur-winged plover (Vanellus spinosus) ही प्रजाती भारतात प्रथमच आढळून आली होती. हा पक्षी कधीच स्थलांतर करीत नाही; किंवा यापूर्वी कधीही भारतीय उपखंडात नोंदविला गेला नसल्याने ही नोंद विशेष ठरली होती. जानेवारी २०२४ दरम्यान 'स्परविंग्डलॅपविंग'हा पक्षी तेलंगणा राज्यात, वारंगल शहराजवळ असलेल्या अम्मावरीपेटा तलावावर, येथील प्राणिशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. जगनपन्नाला यांना आढळून आला होता. मात्र, त्यांनी या पक्ष्याची ओळख 'नदी टिटवी' अशी केली. पुढे फेब्रुवारी महिन्यात, ग्रेट बॅकयार्ड बर्ड काउंट (GBBC) व हैदराबाद बर्ड रेस दरम्यान वारंगल येथील पक्षी-अभ्यासक छायाचित्रकार इंद्राम नागेश्वर राव व डॉ. जगनपन्नाला, हे परत या ठिकाणी गेले असता त्यांना ही प्रजाती पुन्हा आढळून आली. इंद्राम यांनी या पक्ष्यांची छायाचित्रे घेतली. त्यावेळी इंद्राम नागेश्वर राव यांना हा पक्षी, ही वेगळी कुठली तरी टिटवी आहे, अशी शंका आली. त्यांनी काढलेले फोटो विविध संदर्भ पाहून तपासले असता हा पक्षी'स्पर-विंग्डलॅपविंग,Spur-winged Lapwing' नावाची भारतात आजवर कधीही आढळून न आलेली टिटवी असल्याचे दिसून आले. भारतीय पक्षीविश्वासाठी ही आश्चर्यकारक नोंद होती. या प्रजातीची ही पहिलीच नोंद ठरल्याने ही बातमी देशभर पसरली.

हा पक्षी बघण्यासाठी जाण्याचे बरेच दिवसांपासून विचार करीत होतो; परंतु आमचा कार्यक्रम ठरेस्तोवर मे महिना उजाडला. त्यामुळे आता हा पक्षी त्या ठिकाणी दिसेल की नाही अशी शंका असल्याने निघण्यापूर्वी श्री. नागेश्वर राव ह्यांच्याशी बोलून नियोजन केले. ही प्रजाती अजूनही येथे दिसत असल्याचे कळल्यावर आम्ही तिथे जायचे निश्चित केले होते. मी, माझा सहकारी सौरभ जवंजाळ, आणि माझा मुलगा अखिलेश, कुटुंबासह अमरावतीवरून सकाळी निघालो व सायंकाळपूर्वीच थेट तलावावर पोहोचलो.

तलावाजवळ गाडी उभी करून पक्षीशोध सुरू झाला. अक्खा तलाव पालथा घातला, तलावाच्या काठावरील शेतं, माळरान शोधले, आवाजावरून मागोवा घेतला परंतु, 'तो' काही सापडला नाही. नागेश्वर ह्यांच्याशी बोलणे झाले, त्यांनी पुन्हा काही टिप्स दिल्या. त्याचा आवाज कसा आहे, हे सांगितले. तरीही 'तो'काही दिसेना. निराश होऊन आम्ही गाडीजवळ पोहोचलो. सायंकाळ होत आल्याने, बगळे, कावळे यांसारखे काही पक्षी आपआपल्या घरट्यांकडे परतत होते. गाडीत बसण्यापूर्वी आम्ही परतीकडे जाणाऱ्या पक्ष्यांकडे आशेने पहात होतो. तेवढ्यात एक टिटवी वरून उडत जातांना दिसली. टिटवीचाच, परंतु आखूडसा,'पिक-पिक' असा आवाजसुद्धा ऐकू आला. पांढरे शेपूट आणि काळे पोटसुद्धा दिसले. हीच ती 'स्परविंग्ड लॅपविंग' असल्याची खात्री पटली. आम्ही तिला तलावावर शोधत होतो त्यावेळी ती, तलावाच्या एका बाजूला असलेल्या 'बेशरमी'च्या मागे गवती कुरणांवर, तेथील जनावरांसोबत चरत होती. जनावरे चरत असल्याने नेमका तोच भाग आम्ही दुर्लक्षिला होता. तेथून ती उडून आमच्या डोक्यावरून उडत बाजूला असलेल्या इलेक्ट्रिक पॉवर हाउसच्या मागील भागाकडे निघून गेली. तिने आम्हाला उसंतच दिली नाही. त्यामुळे, फोटो काढता आला नाही. ती जिकडे उतरली तिकडे जाणे शक्य नसल्याने आणि दुसऱ्या दिवशी आम्ही पुनश्च येणार असल्याने, त्यादिवशी आम्ही वारंगलकडे निघालो.

जगभरात लॅपविंग म्हणजेच टिटवीच्या एकूण २३ प्रजाती आढळून येतात. यांपैकी भारतीय उपखंडात व्हॅनेलस (Vanellus) कुळातील एकूण सात प्रजाती आढळून येतात. यांमध्ये लाल गालाची 'टिटवी' (Red-wattled Lapwing),पिवळ्या गालाची 'माळटिटवी' (Yellow-wattled Lapwing), आणि 'नदी टिटवी' (River Lapwing); ह्या तीनच प्रजाती स्थानिक रहिवासी असून इतर चार प्रजाती ह्या स्थलांतर करून भारतात येत असतात. स्थलांतर करून येणाऱ्या प्रजातीमध्ये 'राखी डोक्याची टिटवी'(Grey-headed Lapwing), 'संघचारी टिटवी'(Sociable Lapwing),'तुरेवाली टिटवी'(Northern Lapwing) आणि'पांढऱ्या शेपटीची टिटवी'(White-tailed Lapwing),ह्या चार प्रजातींचा समावेश आहे.

वर्ष २०२४ च्या सुरुवातीला'स्परविंग्डलॅप विंग'नावाची भारतात कधीही न आढळून आलेली आणि स्थलांतर करून न येणारी एक नवीन लॅपविंग-प्रजाती, भारतात प्रथमच आढळून आली होती. टिटवीची ही प्रजाती प्रामुख्याने भूमध्य-समुद्राच्या भोवतालच्या तुर्की, इराण, सौदी अरेबिया, इजिप्त, तसेच सहारा-प्रदेश आणि पूर्व-आफ्रिकेकडील भागात आढळणारी एक टिटवीची प्रजाती आहे. आपल्या देशातील लाल गालाची 'टिटवी' जशी सर्वत्र आढळते, त्याचप्रमाणे 'स्परविंग्ड लॅपविंग' भूमध्य प्रदेशातील देशांमध्ये सर्वत्र आढळणारी; तेथील पाणथळी व तलावांवर दिसणारी एक सामान्य प्रजाती आहे. साधारणतः आपल्या टिटवीच्या आकाराची व रंगाने आपल्या देशातील 'नदी टिटवी' प्रमाणे दिसणारी व सहज ओळखता येणारी ही प्रजाती, डोक्यावर संपूर्ण काळी टोपी, गळ्याच्या खालील भाग व छाती पूर्णतः काळी, तसेच शेपटीची टोके काळ्या रंगाची, मान शुभ्र पांढरी व पंखांचा रंग मातकट करडा! 'नदी टिटवी' (River Lapwing) ला पूर्वी आपल्या देशात 'स्परविंग्ड प्लोवर, Spur-winged Plover' अशी ओळख असल्याने, सुरुवातीला या प्रजातीला समजून घेताना बराच गोंधळ झाला होता.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता आम्ही पुन्हा तलावावर पोहोचलो. अवघ्या पाचच मिनिटांत इंद्रामसुद्धा तलावावर पोहोचले. आम्ही आमचे कॅमेरे व दुर्बिणी बाहेर काढल्या आणि शोध सुरू केला. तलावाच्या काठच्या रस्त्यावर दुसऱ्या बाजूने असलेल्या डबक्यात मोठ्या प्रमाणात पाण्यातील उंच गवत वाढलेले होते, भोवताली बाभळीची झाडे वाढलेली होती. या भागात बया म्हणजेच सुगरणीचा थवा कलकलाट करीत होता. तेथून जाताना इंद्राम यांनी अगदी सहजपणे ते पक्षी 'रेषाळ सुगरण' (Streaked Weaver) असल्याचे सांगितले. आमच्यासाठी तो नवीन पक्षी असल्याने आम्ही तिथेच थांबलो. आपल्या सुगरण पक्ष्याची दुसरी प्रजाती, जी आपल्या भागात सहज आढळत नाही, त्यांचा थवा त्या झाडावर होता. विशेष म्हणजे, त्यातील काही नर पक्षी घरटे बांधणीत गुंतलेले होते. आम्ही त्यांचे मनसोक्त फोटो काढून पुढे निघालो. तोपर्यंत इंद्राम यांची नजर, आमचे लक्ष्य असलेली प्रजाती शोधतच होती. साधारणतः ७ वाजता तो पक्षी इकडे उतरतो, अशी माहिती त्यांनी दिली. आणि अगदी थोड्याच वेळात ती'स्परविंग्ड लॅपविंग' उडत-उडत येऊन तलावाच्या काठावर उतरली. आम्ही दुर्बिणीतून बघून खात्री करून घेतली; ती 'स्परविंग्ड लॅपविंग'च होती. आम्ही काही रेकॉर्ड शॉट घेऊन पुढे निघालो आणि बराच वेळ तिचे निरीक्षण करून फोटो आणि व्हिडीओ घेतले. ही प्रजाती इतर काही लाल गालाच्या टिटव्यांसोबत; परंतु थोडे अंतर राखून चरत होती. जानेवारी पासून हा पक्षी या ठिकाणी मुक्काम ठोकून होता आणि आम्हाला तो बघता आला याचा आनंद झाला. आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे, इंद्राम यांनी सांगितल्यानुसार मध्यंतरी या प्रजातीचा आणखी एक पक्षी या ठिकाणी आढळून आला, आणि या प्रजातीची संख्या दोन इतकी झाली. आम्हाला मात्र, त्यादिवशी एकच पक्षी दिसून आला.

या पक्ष्याचे मनसोक्त निरीक्षण करून आम्ही तलावाच्या काठाने पुढे निघालो. मे महिना असूनही बरेच पक्षी तलावावर होते. त्यामध्ये 'अडई' बदक म्हणजेच "Lesser Whistling-Duck वा

Lesser Whistling Teal' ची संख्या मोठ्या प्रमाणात होती. माझा सहकारी सौरभ मात्र या थव्यात या स्थानिक बदकाची दुसरी प्रजाती "Fulvous (पिंगट) Whistling-Duck' चा शोध घेत होता. ही प्रजाती येथे सापडते ही माहिती इंदराम यांनी दिल्याने आमच्या आशा पल्लवित झाल्या. आणखी थोडे पुढे गेल्यावर ही प्रजातीसुद्धा आम्हाला आढळून आली. 'फुल्वस व्हिसलिंग-डक' आम्ही प्रथमच बघत असल्याने आणखी एका नवीन प्रजातीची आमच्या यादीत भर पडल्याचा 'बोनस' आनंद आम्हाला झाला. पुढील तासाभरात आम्ही तेथील सर्वच पक्ष्यांची नोंद करून 'ई-बर्ड'वर टाकली आणि समाधानाने वारंगलकडे परत निघालो. यादरम्यान आम्हाला 'स्परविंग्ड लॅपविंग'ची दुसरी जोडीदार मात्र दिसू शकली नाही. मात्र, हे जर खरच दोन पक्षी असतील, तर या ठिकाणी किती दिवस थांबतील आणि दोन पक्षी नर-मादी असतील तर प्रजनन होऊ शकेल का; आणि ते इथले स्थानिक रहिवासी होतील काय, इत्यादी प्रश्न मनात घेऊन पुढील प्रवासास लागलो.



*****

## स्वागत नवीन सभासदांचे

**(दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते ३० जुन २०२५ )**

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १६३० | हिंगणगाव | श्री. सचिन रेवननाथ साळुंखे | 7040294084 | sachinsalunkheofficial@gmail.com |
| १६३१ | मुंबई | श्री. केदार गिरीश गोरे | 9820231239 | gore.kedar@gmail.com |
| १६३२ | लांजुड | कु. समिक्षा राजु शिंगाडे | 8080844116 | samikshashingade29@gmail.com |
| १६३३ | पुणे | श्री. अविनाश उमाकांत फाटक | 7057188998 | avinapune@gmail.com |
| १६३४ | नागपुर | श्री. अजय जगदीश पंढरीपांडे | 8421833135 | ajayash.pande@gmail.com |
| १६३५ | अकोला | श्री. हेमंतकुमार नंदकिशोर शाह | 9422937771 | hemantshah1961@gmail.com |
| १६३६ | परभणी | श्री. संतोष वसंतराव रनखांब | 9404241492 | \|santosh.rankhamb@gmail.com |
| १६३७ | अमरावती | श्री. सर्वेश मनिषा विनोद मराठे | 9021909555 | sarveshmarathe555@gmail.com |
| १६३८ | अहिल्यानगर | श्री. ज्योती रावसाहेब ढाकणे | 8308375979 | jyotidhakne22@gmail.com |
| १६३९ | अहिल्यानगर | श्री. सचिन राजेंद्र पाटस्कर | 9225879192 | sachinpataskar92@gmail.com |
| १६४० | अकोला | श्री. प्रदिप अजाबराव अवचार | 8379952261 | pradip.sun29@gmail.com |
| १६४१ | अकोला | श्री. हर्षवर्धन सरिता कृष्णराव देशमुख | 9923382022 | hkdeshmukh1@gmail.com |
| १६४२ | पंढरपुर | श्री. मोहन भिमराव सावंत | 8149551255 | mbs4141@gmail.com |
| १६४३ | अकोला | श्री. प्रविण वासुदेवराव पळसपगार | 9850322842 | pravinpalaspagar@gmail.com |
| १६४४ | कोल्हापूर | ज्ञानेश्वर गुंडू दळवी | 9421948808 | dnyanesh02320@gmail.com |
| १६४५ | यवतामाळ | इबाद अहमद मो. जावेद इकबाल | 9766946668 | ibanahmad9@gmail.com |
| १६४६ | नागपूर | श्री. हरिओम रामनाथ भद्रे | 7219164333 | hariom.bhadrey@gmail.com |

# ऋणानुबंध



**डॉ. अनिल माळी**
सहसंघटक,महाराष्ट्र पक्षिमित्र
नाशिक

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी १९८१ मध्ये लिखाणाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी २५ हून अधिक पुस्तके तसेच पक्षीकोश व इतर कोशांचे लेखन सुरू ठेवले होते. मराठी साहित्य विश्वाला त्यांनी एक हिरवी वाट दाखविली. नुसतेच ललित लेखन केले नाही तर या तीन तपांच्या अरण्य भ्रमंतीत एक लक्ष नवीन शब्द मराठीत आणले. त्यासाठी त्यांनी वनवासी, कोळी, जंगलमित्र, निसर्गमित्र; तसेच पक्षीमित्रांशी सतत संवाद साधला.

निसर्गाची भाषा त्यांना अवगत झाल्याने निसर्गावर प्रेम करा, निसर्गाचं संरक्षण करा हा संदेश ते लेखनातून देत राहिले.

'अरण्येही मंदिरे आहेत, तिथे प्रवेश करताना नम्र व्हाल तरच तुम्हाला त्या वनाचे पावित्र्य कळेल,'असे नवीन भेटणाऱ्या पक्षी मित्रांना ते नेमाने सांगत. नागझिरा अभयारण्य, नवेगांव राष्ट्रीय उद्यान, कर्नाळा पक्षी-अभयारण्य, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, याठिकाणी कार्यरत असताना त्यांनी या अरण्य मंदिरांना, निर्माण करून दिलेली ओळख, केवळ अविस्मरणीय आहे.

त्यांनी अनेक पक्षीअभ्यासक उभे केले. नाशिकमध्ये १९८७ मध्ये झालेल्या पक्षिमित्र संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तसेच कै. डॉ. विनय ठकार, दिगंबर गाडगीळ, दत्ताकाका उगावकर, शिवाजी तुपे यांच्याशी ते सातत्याने संपर्कात होते. पुढे ते २००६ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले; त्यावेळी त्यांच्याशी माझा संपर्क जास्त वाढला. त्यानंतरते, ज्योती स्टोअर्सचे श्री. वसंत खैरनार यांच्या 'लेखक तुमच्या भेटीला' या उपक्रमात सुद्धा सहभागी झाले होते.

मे २००९ मध्ये चितमपल्ली साहेब माझ्या नाशिक येथील 'नेस्ट' या घरी राहण्यासाठी ५, ६ दिवस आले होते. त्यावेळी मी, माझी पत्नी प्रतिभा, मुले ओजस व विहंग यांना त्यांची सेवा करता आली. या कालावधीत त्यांनी पक्ष्यांची व वन्यजीवांची, मी काढलेली सर्व छायाचित्रे बघितली व आनंद व्यक्त केला. त्याच दरम्यान नाशिकचे भूषण असलेल्या वसंत व्याख्यान मालेमध्ये ३ मे २००९ ला मी व दिगंबर गाडगीळ यांनी त्यांची मुलाखत घेतली होती. त्यावेळी नाशिककरांना त्यांचे अरण्य-अनुभव ऐकता आले. त्या कालावधीत आम्ही नांदूर मध्यमेश्वर अभयारण्य, बोरगड, नक्षत्रवन, छायाचित्रकार प्रसाद पवार, चित्रकार शिवाजी तुपे यांचा स्टुडिओ इथेही भेटी दिल्या. मी व चितमपल्ली साहेब नाशिकच्या नेहरू उद्यानाला भेट देण्यास जात असताना त्यांनी नाशिकचे वृक्षारोपण व प्रजातींची निवड चुकीच्या पद्धतीने झाले असल्याचे सांगितले व चर्चेअंती 'वृक्षांची लागवड कशी करावी' या पोस्टरची निर्मिती झाली. त्याच्या अंतापर्यंत १० हजारपेक्षा जास्त पोस्टरचे वाटप मी केले आहे व लाखो वृक्षप्रेमी, निसर्गप्रेमीं पर्यंत ते सोशल मिडियावरून पोहचविलेले आहेत. त्यांच्या पक्षिकोश, प्राणीकोश, कालिदासाचे वृक्ष इत्यादीसाठी मी माझी छायाचित्रे दिली होती.


दिगंबर गाडगीळ, दत्ता काका उगांवकर यांच्यानंतर नाशिकला महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे तिसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचा मान मला मिळाला त्यासाठी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद मोलाचा ठरला. त्यांच्या निधनाने निसर्गाशी संवाद साधण्याची नवी दृष्टी देणारा तपस्वी अरण्यऋषी हरपला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

*****





# कोविड, केक, करी, किटिवेक आणि झाकली मूठ !



**डॉ. राजू कसंबे**
पक्षीअभ्यासक,
डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे

ऑगस्ट २०२० मधील लॉकडाऊनचे ते वाईट दिवस होते. आपणा सर्वांना कुठेतरी घराबाहेर पडावेसे वाटत होते. थोडी बंधनं शिथिल करण्यात आली होती. सौ. उज्वलाच्या वाढदिवसाचे निमित्त साधून आम्ही अलिबाग जवळचा आक्षी बीच गाठायचे ठरवले. 'तुझा बर्थडे बीचवर साजरा करू' असे आम्ही तिला सांगितले. अर्थात, मी आणि चि. वेदांतचा छुपा उद्देश मात्र कुठले तरी दुर्मिळ पक्षी शोधायचे हाच असल्याची तिला अंमळ खात्री होती. तिच्यासाठी हे नेहेमीचेच असले तरीही घराबाहेर फिरायला मिळणार, दररोजच्या धुणी-भांडी-स्वयंपाक ह्या रटाळ आयुष्यातून सुट्टी मिळेल म्हणून तीही आनंदाने तयार झाली. निदान तीन दिवस (२१ ते २३ डिसेंबर २०२०) मुंबईच्या खुराड्यातून मोकळा श्वास घ्यायला मिळेल हेच सर्वांचे स्वप्न होते.

आक्षीच्या नेहेमीच्या 'समुद्र दर्शन' होमस्टे सोबत बोलणे झाले. टॅक्सीने गेलो तर चालक सोडून आम्ही कुणाच्याच संपर्कात येणार नव्हतो. होमस्टेमध्ये केवळ वाढपी आमच्या जवळ येणार होता. बीचवर विशेष गर्दी अपेक्षित नव्हतीच. ठरल्याप्रमाणे खरंच आम्ही अगदी पहाटे निघून नाष्ट्याच्या वेळेआधी आक्षी बीचवरच्या 'समुद्र दर्शन' होमस्टेला पोचलो.

सामान खोलीत भिरकावून पटापट आमची शस्त्रे (म्हणजे कॅमेरा, दुर्बिणी, कॅमेरा स्टँड, हॅट, सन स्क्रीन मलम इत्यादी.) बाहेर काढली आणि तडक बीचकडे प्रस्थान केले. बीचवर पोहोचून सहा महिन्यांनंतर आम्ही मोकळा श्वास घेतला.आमची अवस्था पिंजऱ्यातून सुटलेल्या मांजरासारखी झाली होती. अहाहा! जग किती सुंदर आहे. स्वच्छ, सुंदर, खुला समुद्र किनारा, निळे अथांग पाणी, क्षितिजाला टेकणारे निळे आकाश आणि स्वच्छ सूर्यप्रकाश किती आनंददायी असू शकतेयाची अनुभूति आम्ही घेत होतो.

पुढले तीन दिवस-वाढदिवस, बीचवर मनसोक्त भटकंती, मस्त पक्षीनिरीक्षण आणि निवांत झोप काढणे, एवढाच कार्यक्रम होता. कोविडपासून सुटका, सौ.च्या वाढदिवसाचा केक, मासे-करी हादडणे (बांगडा, सुरमई, पापलेट-फ्राय, हे विसरू नका हां), दुर्मिळ किटिवेकचा शोध, आणि पायात कडी घातलेले पक्षी, विशेष करून ग्रेट नॉट शोधणे! खरं तर, सौ. उज्वला, डॉ. प्रांजली, मी, आणि चि. वेदांत,ह्यातील पहिले दोघे आणि दुसरे दोघे ह्यांची वरच्या यादीतील उद्दिष्टे अर्थातच वेगवेगळी होती. इंग्रजीत EAT, BIRD, SLEEP, REPEAT! असे टीशर्टवर वाचले होते. बस्स! हेच करायचे होते.

आजकाल कुठेही जाताना तेथे काय शोधायचे किंवा अपेक्षित पक्ष्यांची यादी आपल्या डोक्यात तयार असते. आक्षीला काय शोधायचे त्याची खूणगाठ बांधूनच मी आणि वेदांत तेथे पोहोचलो होतो. आम्हाला दुर्मिळ ब्लॅक-लेग्ड (काळ्या पायाचा) किटिवेक शोधून काढायचा होता. पायात कडे वा टॅग असलेल्या ग्रेट नॉटची (मोठा जलरंक) छायाचित्रे काढायची होती. हे शोधताना टॅग असलेले इतर प्रजातीचे पक्षी शोधणे, बार-टेल्ड गॉडवीट(पट्टेरी शेपटीचा पाणटिवळा) आणि समुद्री गरुड मिळाला तर मज्जा अशी आमची 'वीश लिस्ट' ठरली होती.

किटिवेक शोधणे अजिबात सोपे काम नव्हते. तेथे जवळपास २००० गल पक्ष्यांचा थवा होता. गल नेहेमी भरती ओहोटीच्या हिशोबाने लाटांच्या अगदी काठावर उतरतात. बीचवर फिरायला आलेले इतर टुरिस्ट या थव्याकडे आकर्षित होऊन जवळ जाण्यामुळे तो थवा इकडून तिकडे उडत असे. मग मी आणि वेदांत  हळूहळू थव्याजवळ जाऊन संपूर्ण थवा 'स्कॅन' करीत असू. किटिवेक सुद्धा गल प्रजातीचा असून पांढरा असतो. त्याची ओळख असलेल्या त्याच्या मानेवरील व पाठीवरील काळा पट्टा, काळी चोच व काळे पाय ह्या खुणा आम्ही शोधत होतो. त्याची ओळख कशी करायची ह्याचे 'होमवर्क' आम्ही आधीच करून ठेवले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी उशिरा मला गल्सच्या थव्यात एक ब्लॅक-लेग्ड किटिवेक दिसून आला. वेदांत थव्याच्या जवळ होता तर मी त्याच्या थोडा मागे होतो. मी त्याला थव्यात किटिवेक नेमका कुठे आहे ते सांगत असतानाच दोन मुली मोबाइलमध्ये छायाचित्रे काढण्यासाठी त्या थव्याकडे धावत सुटल्या. विचलित होऊन उडालेला थवा बॅकग्राऊंड मध्ये ठेऊन एकीने दुसरीचे फोटो काढले असावेत. आम्ही दीर्घ उसासे टाकत केवळ बघत राहिलो. दुर्मिळ पक्षी दिसूनही छायाचित्र घेता आले नाही ह्याची खंत करीत मस्त तळलेल्या पापलेट माशांकडे आम्ही आमचा मोर्चा वळवला. दुपारची उन्हं टाळून आम्ही निवांत झोप काढली.

पक्ष्यांच्या थव्याकडे आकर्षित होणारे टुरिस्ट, पक्ष्यांचा पाठलाग करणारी भटकी कुत्री, नागाव बीचकडे जाणारी गावकऱ्यांची वाहने (मोटरसायकल, घोडागाडी,जीप, ट्रॅक्टर इ.) मुद्दाम किंवा अनाहूतपणे पक्ष्यांना उडवून देत असत. वेदांत मेहनतीने रांगत रांगत

थव्याजवळ पोहोचायचा आणि असे काहीतरी विपरीत घडायचे. मग आम्ही पुन्हा थवा उतरला की तिकडे आमचा मोर्चा वळवायचो. सौ. उज्वला आणि प्रांजली आमच्यासाठी नाश्ता घेऊन बीचवर भटकत यायच्या. वेदांत कुठेतरी 'आय-लेवल' फोटो काढण्याच्या नादात पालथा लोळलेला सापडत असे! त्याच्याच आसपास हॅट घालून डोळ्याला चिकटलेली दुर्बिण असलेली अस्मादिकांची आकृति अनुभवी नजरेने दुरूनच त्या सहज शोधून काढीत असत. 'काही मिळाले का?' हा प्रश्न आम्हा वेड्यापीरांना विचारीत. आम्ही 'हो, टॅग वाले बरेच पक्षी मिळाले' असे सांगून फोटो दाखवीत गरम-गरम पोह्यांवर तिथेच ताव मारीत असू.

होमस्टेला जाऊन आम्ही टॅग असलेल्या पक्ष्यांची ओळख करणे, यादी आणि दिसलेल्या सर्व पक्ष्यांची चेकलिस्ट (यादी) तयार करीत असू. चेकलिस्ट 'ई-बर्ड'वर लागलीच अपलोड होत असे. हळूहळू ह्या याद्या फुगत होत्या. काही नाही मिळाले तरी टॅग असलेले पक्षी मात्र दर खेपेला मिळत होते. वेदांतच्या हातात जलद फोटो काढणारा 'एस.एल.आर' कॅमेरा तर माझ्या दिमतीला सुपरझूम असलेला निकॉनचा डिजिटल कॅमेरा होता. त्यामुळे वेदांत उडणाऱ्या पक्ष्यांची इत्यादी,'चॅलेंजिंग' छायाचित्रे घेत असे व मी दूरवरच्या पक्ष्यांची, पक्ष्यांच्या पायाला असलेल्या टॅगची तसेच त्यांच्या वर्तणूकीची छायाचित्रे आणि व्हिडिओ घेत असे. सकाळी सकाळी समुद्रावरच्या खुल्या वातावरणाचा आनंद घेत प्रातर्विधी करणारे बहाद्दर फोटोत येऊ नये म्हणून आम्ही काळजी घेत असू!

पायात टॅग असलेल्या ग्रेट नॉटची इतर तीन सजातीय नॉटसोबत तुरूतुरू धावतानाची छायाचित्रे वेदांतने टिपली. मी व्हिडिओ काढले. टॅगवर असलेले रंग स्पष्ट दिसतील अशी अनेक छायाचित्रे आम्हाला मिळाली. ह्या एकाच्या उजव्या पायात दोन रंगीत फ्लॅग होते, वरील फ्लॅगचा रंग हिरवा तर खालील फ्लॅगचा रंग नारिंगी होता. हा पक्षी सर्व प्रथम पक्षीमित्र अविनाश भगत ह्याला इथे दिसला होता. पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी कुठल्या देशाच्या शास्त्रज्ञांनी कुठल्या रंगाचे टॅग लावावेत ह्याची एक आंतरराष्ट्रीय नियमावली (प्रोटोकॉल) आहे. त्याचा संदर्भ बघितला तर हा नॉट पक्षी पूर्व-चीनमध्ये टॅग केलेला होता. नंतर, मी हाँगकाँग येथील श्रीमती कॅथरीन लिउंग ह्यांच्याशी संपर्क केला असता ह्या पक्ष्याला ईशान्य-चीनमधील लेऑनिंग प्रांतातील या लूजियांग येथे २० ऑगस्ट २०२०ला टॅग लावल्याचे कळले. अविनाशला तो ७५ दिवसांनंतर आणि आम्हाला १२० दिवसानंतर दिसला होता. त्याने या लूजियांग ते आक्षी असे सरळ रेषेतील किमान ५४२५ किमी अंतर उडून पार केले होते.

आमच्या 'विश-लिस्ट'मधला महाराष्ट्रात कमी आढळणारा 'बार-टेल्ड गॉडवीट' सुद्धा छान मिळाला. त्याच्या सारखाच दिसणारा 'ब्लॅक-टेल्ड गॉडवीट' किनारपट्टीवर संपूर्ण हिवाळ्यात दिसतो तर आंतर्भागात केवळ परतीच्या प्रवासादरम्यान तो दिसतो. भरपूर वेळ असल्यामुळे मी प्रत्येक प्रजातीच्या चिखल पायट्यांची (वेडर्स) छायाचित्रे तसेच छोटे-छोटे व्हिडिओ घेत होतो. त्यामुळे त्यांची धावण्याची व चिखलात खाद्य शोधण्याची विशिष्ट पद्धत आपल्याला समजते.

शेवटल्या दिवशी आम्ही दोघे गल पक्ष्यांचे थवे निरखून बघत होतो. एक मोठा थवा आमच्याकडे उडत आला (अर्थात तिकडे कुणीतरी उडवून दिल्यामुळे) आणि समोरच पाण्याजवळ उतरला. मी दुर्बिणीतून स्कॅन करायला लागलो. थव्याच्या टोकाला काळा खांदा, पंखावर काळा पट्टा असलेला एक पांढरा गल अलगद उतरताना दिसला. मी वेदांतला 'फ्लॉकमधला डावीकडून तिसरा पक्षी - किटिवेक' असे अलर्ट केले. माझे व्हिडिओ आणि वेदांतची शटरची फायरिंग सुरू झाली. किटिवेक आज हलक्या लाटांमध्ये निवांत आंघोळ करीत होता. आम्ही मनसोक्त फोटो काढले. आणि अचानक संपूर्ण थवा उडाला. तृप्त मनाने आम्ही एकमेकांकडे बघितले आणि कॅमेरे दुर्बिणी उचलून चालू लागलो. तेवढ्यात तेथे एक वयस्कर (माझ्यासारखे) पक्षीमित्र घडी होणारी खुर्ची घेऊन आले. त्यांनी आम्हाला दुरूनच 'काही विशेष मिळाले का?' असे विचारताच आम्हीही सुरक्षित अंतरावरूनच 'किटिवेक' हे उत्तर दिले! 'कुठे?'. 'ह्याच थव्यात होता. आत्ताच उडाला'. त्यांचा भ्रमनिरास झाला. पण पक्षीनिरीक्षण असेच असते. एका क्षणाचा उशीर आणि तुम्हाला तो 'विश-लिस्ट' मधील दुर्मिळ पक्षी 'लाईफर' मिळायचा राहून जातो. तो योग पुन्हा कधीतरी घडेल ह्या आशेने आपला दिवस निघून जातो. पुन्हा त्या ठिकाणी जाण्याचे निमित्त आपल्याला मिळते. प्रचंड आशावाद आणि इच्छाशक्ति हीच यशस्वी पक्षीमित्रांची गुरुकिल्ली आहे.

अरे वाढदिवसाचे विसरलोच की. सूर्यास्ताच्या वेळेस समुद्रकिनाऱ्यावर छान केक कापून सौ.चा वाढदिवस चौघांनीच साजरा केला. बर्थ-डे गिफ्ट म्हणून तिच्याकडून आम्हाला ही सहल लाभली होती. पण स्वार्थी पक्षीनिरीक्षक लेखाच्या मथळ्यात असलेला 'केक'सुद्धा विसरू शकतो हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेलच. पुनःपुन्हा तिच्यासोबत अशा सहली करायच्या असल्यामुळे हे लिहिणे गरजेचे आहे. सूर्यास्ताच्या वेळेस बायको आणि मुलीचे आम्ही फोटोसेशन करीत असू. त्यात सूर्य हातात धरताना, त्याच्यासोबत खेळताना इत्यादी. ट्रिक फोटो काढायचा देखील आम्ही प्रयत्न करीत असू. कधीमधी मलासुद्धा मॉडेल बनवून वेदांत आमचे फोटो काढीत असे.

विश-लिस्टमधले बहुतेक सगळे पक्षी बघून झाले होते. समुद्र गरुडाने मात्र दर्शन दिले नव्हते. एकूण ६७ पक्षीप्रजाती आम्हाला दिसल्या होत्या. मुंबईच्या बी.एन.एच.एस.द्वारे टॅग केलेले १६ आणि चीनवरून स्थलांतर करून आलेले, असे एकूण १७ वेडर्स आम्ही शोधले होते. सुरय (टर्न) पक्ष्यांच्या सात प्रजाती आम्ही बघितल्या; छोटा, सामान्य, सँडविच मध्यम, कॅस्पिअन, छोटा तुरेवाला, मोठा तुरेवाला, आणि गल-बिल्डकुरव चोचीचा! अपेक्षित असलेल्या वेडर्सच्या बहुतेक प्रजाती आम्हाला दिसल्या होत्या. त्यात सामान्य हिरवा टिलवा (कॉमन ग्रीनशँक), उलटचोच तुतारी (टेरेक सँडपायपर), बाकचोच तुतारी (कर्ल्यू सँडपायपर), रंगीत तुतारी (रड्डी टर्नस्टोन), कवड्या टिलवा (सँडर्लिंग), करडा टिलवा (डन्लीन), छोटा व मोठा चिखल्या (ग्रेटर व लेसर सँडप्लोवर), केंटीश चिखल्या (केंटीश प्लोवर),इत्यादींचा उल्लेख करता येईल.

जसे आलो तसेच-कुणाच्याही संपर्कात न येता-परत टॅक्सी करून छान सहल झाल्याच्या समाधानाने मुंबईला घरी परतलो. चीनवरून स्थलांतर करून आलेल्या ग्रेट नॉटबद्दल तसेच किटिवेक बद्दलच्या नोंदी आम्ही नंतर प्रकाशित केल्या आणि ही आक्षीची सहल हळूहळू विस्मरणात जाऊ लागली.

**झाकली मूठ:** त्यानंतर जवळपास दहा महिन्यांनी मला बी. एन. एच. एस. च्या 'हॉर्नबिल' त्रैमासिकासाठी चिखलपायट्या पक्ष्यांचे (वेडर्सचे) चांगले फोटो असतील तर पाठवा म्हणून मागणी झाली. म्हणून मग आक्षीचे सगळे फोटो खंगाळून त्यातील वेडर्सचे चांगले फोटो वेगळे करायला घेतले.

अनेकदा आपल्या फोटोंचा असा कुठेतरी सदुपयोग होतो. नाहीतर ते लॅपटॉप वा हार्डडिस्कमध्ये नुसतेच पडून असतात. पक्षीमित्र आदेश शिवकर अशा फोटोंच्या साचलेल्या संग्रहाला 'इलेक्ट्रॉनिक गार्बेज' (कचरा) म्हणतात. एकदा, असे फोटो शोधताना मला 'कॉमन' ग्रीनशँक' पक्ष्याचे फोटो दिसले. माझ्या मनात पाल चुकचुकली. हे 'कॉमन' ग्रीनशँक वाटत नाहीये. मी वेदांतला बोलावले. इंटरनेटवरील फोटोंसोबत तुलना करून झाली. हे सगळे फोटो भारतात अतिशय दुर्मिळ असलेल्या 'नॉर्डमॅन्स ग्रीनशँक'सारखे वाटत होते. ह्या प्रजातीची इथे यापूर्वी नोंद झालेली नव्हती. त्यामुळे असा दावा करणे धाडसाचे ठरले असते. पण, प्रत्येक पक्ष्याची ओळख पटविली नाही तर दुर्मिळ पक्षी आपल्याला कधी मिळणारच नाहीत. प्रत्येक वेळेस स्वतःच्या ज्ञानाला आपण स्वतः आव्हान देत रहायला हवे. तरच निसर्ग नवीन ज्ञान आपल्या झोळीत घालतो. 'मला हे आधीच माहिती होते, त्यात नवीन काही नाही,' ही मानसिकता आपल्याला नवीन गोष्टी शिकण्यापासून परावृत्त करते.

खरं तर,आक्षीला 'नॉर्डमॅन्स ग्रीनशँक' अपेक्षिततही नव्हता. भारताच्या पूर्व किनारपट्टीवर अथवा अगदी बांग्लादेशा जवळील सुंदरबन प्रदेशात, तो दिसणे अपेक्षित होते. 'नॉर्डमॅन्स ग्रीनशँक'चे पाय थोडे आखूड, चटकदार पिवळे असून, बुडाला फिक्कट असलेली दुरंगी चोच जाड असते. मान आखूड असून नेहेमी आत घेतलेली असते. ह्या खुणांवरून त्याला 'कॉमन ग्रीनशँक'पासून वेगळे ओळखता येते.

मी ह्या 'ग्रीनशँक'ची काही छायाचित्रे मित्र आदेश शिवकर तसेच मयूरेश खटावकरला व्हाट्सॅपवर पाठविली. त्यांची होकारार्थी पण सावध प्रतिक्रिया,'वाटतेय खरं, पण इतर एक्स्पर्ट्सचे मत घेऊ या!'म्हणून मग, मी काही फोटो 'आस्क आयडी' ह्या फेसबूक समूहावर टाकले. तो पक्षी भारतात अतिशय दुर्मिळ असलेला 'नॉर्डमॅन्स ग्रीनशँक' असल्याचे शिक्कामोर्तब झाले. 'इंडिअन बर्ड्स' या जर्नलचे संपादक व मित्र प्रवीण जयदेवन ह्याने माझ्याशी संपर्क साधला. त्याने यापुर्वीच 'नॉर्डमॅन्स ग्रीनशँक'च्या भारतातील सर्व ऐतिहासिक नोंदी तपासून पाहिल्या होत्या आणि यापूर्वीची भारतातील कुठलीही नोंद खात्रीलायक नसल्याचे निदान केले होते. त्याने ही सर्व अभ्यासपूर्ण माहिती मला पुरविली आणि मी आणि वेदांतच्या नावावर 'भारताच्या पक्षीसूचीत नॉर्डमॅन्स ग्रीनशँकची भर' ही संशोधन नोंद 'इंडिअन बर्ड्स'ह्या पक्षीशास्त्राला वाहिलेल्या जर्नलमध्ये प्रकाशित झाली. त्यात असलेल्या ऐतिहासिक नोंदींसाठी प्रवीणच्या नावाचा उल्लेख आम्ही केला. आक्षीच्या आमच्या भेटीतील सर्वात महत्त्वाची नोंद दहा महीनेपर्यंत 'झाकली मूठ सव्वालाखाची'सारखी गोष्ट घडली. भारताच्या पक्षीसूचीत एखाद्या दुर्मिळ पक्ष्याची नोंद काही दररोज करता येत नाही. त्यासाठी तिथे जाऊन बायकोचा वाढदिवस साजरा करावा लागतो...

म्हणून सर्व पक्षीमित्रांना मी सांगू इच्छितो की पत्नीचा वाढदिवस दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी साजरा करा. तुम्हाला निसर्ग सहवास, कुटुंबासोबत निर्भेळ सहलीचा आनंद तर लाभेलच, भरपूर पक्षीनिरीक्षण सुद्धा करता येईल. लेखाचा मथळा 'घर बंदूक बिर्याणी' ह्या चित्रपटाच्या नावावरून घेण्याचा 'लांबुळका' प्रयत्न केला. तो साधला की नाही ठरवायचे हे तुमच्यावरच सोपवतो!

*****



# मचाणावरची पाखरं





**डॉ. प्रमोद वाठोरे**
पक्षी अभ्यासक
नांदेड


बुद्धपौर्णिमा..! निसर्गप्रेमींच्या उत्साहाला उकळ्या फोडणारा हा शब्द ह्यावर्षी नवेगाव नागझिऱ्याच्या पक्षीस्वर्गात घेऊन गेला. मचाणावर बसून पाणवठ्यावर येणाऱ्या पशुपक्ष्यांच्या नोंदी घेण्याचा हा अनुभव! वन विभागाची व्हॅन आम्हाला घेऊन दुपारीच मचाणाकडे निघाली. खडकाळ वनमार्गांवरून हिंदकळतांना सुद्धा डोळे नशीब आजमावत सर्वत्र भिरभिरत होते. रस्त्यात दोन वेळा राखी रानकोंबड्यांचे (Gray Junglefowl) फोटो घेण्यासाठी गाडी थांबवली; पण चतुर चलाख कोंबड्यांनी आमच्या हातावर तुरी देत पळ काढला.

दुपारी ३:४५ च्या आसपास व्हॅन आम्हाला सोडून निघून गेली आणि आम्ही मचाणावर स्थिरस्थावर झालो. सुरुवातीची दहा-पंधरा मिनिटेमी, सुमेध व वनरक्षक श्री. हत्ते साहेब हलक्या आवाजात गप्पा मारत असतानाच बाजूच्या झाडावरून 'मधुबाज' (Oriental Honey Buzzard) उडत गेला. हा शिकारी पक्षी मधाच्या पोळ्यावर हल्ला करून तेथील मधमाशांच्या अळ्या, मध, पोळे व इतर कीट, पतंगयांवर गुजराण करतो. आम्ही बेसावध असल्यामुळे त्याला कॅमेऱ्यात टिपता आले नाही. अशारीतीने, निसर्गाने आमचे कान पिळले आणि लगेच शांत होऊन आम्ही आपापल्या जागांवर लक्ष केंद्रित करून बसलो. ध्यान धारणेसाठी जंगल एक उत्कृष्ट ठिकाण आहे. जसे जसे आम्ही शांत झालो, आजूबाजूच्या संगीतमय सुरावळी कानांवर यायला लागल्या, 'पेरते व्हा, पेरते व्हा' म्हणत पावसाच्या आगमनाची चाहूल देणारे 'पावश्या,' निसर्गाने भरभरून सौंदर्य दिलेले 'नवरंग,' या हंगामी, आणि मधूनच खट्याळपणे आम्हाला चिडवणारे 'रानकोंबडे,' या स्थानिक पक्ष्यांच्या सूरमयी मैफिलीने आसमंत भरून गेला. साथ द्यायला वरच्या पट्टीतले गायक 'मोर, टकाचोर आणि खंड्या' होतेच. कान तृप्त झाले. समोरच पाणवठ्यावर स्वर्गीय नर्तकांचा (asian Paradise Flycatcher) कलाविष्कार चालू होता.

पक्ष्यांच्या शाळेतील मस्तीखोर मुलांवर वचक ठेवणाऱ्या शिक्षकाची म्हणजे 'युरेशियन चिमणमार ससाणा' (Eurasian Sparrowhawk) याची पहिली भेट झाली. इवल्याशा चोचीत थेंब-थेंब पाणी पीत असतानाच तो कॅमेऱ्यात सापडला. सहसा चिमण्यांची शिकार करणारा हा पक्षी वेळप्रसंगी अर्ध्या किलोच्या पक्ष्याला पण ठार करू शकतो.

पावसाळा म्हणजे पक्ष्यांच्या विणीचा हंगाम. सगळीकडे हिरवळ अन् पाण्याची मुबलकता असल्यामुळे नर-पक्षी माद्यांना रिझविण्यासाठी, ठेवणीतले पोशाख घालून प्रणयातूर माद्यांना साद घालत असतात. निसर्गामध्ये सौंदर्याची मक्तेदारी ही नरपक्ष्यां कडेच असते. उदाहरणादाखल, जरी नरापेक्षा सुंदर असलेली मादी सापडली तर नवलच म्हणावं लागेल.प्रत्येक नर-पक्षी या काळात सौंदर्याच्या अत्युच्च शिखरावर असतो. नानाविध रंगांची पिसे (breeding plumage) मिरवत हे पक्षी घरटी बनवतात. ती सुरक्षित रहावीत म्हणून जीवाचा आटापीटा करतात. ससाणा पाणी पिऊन उडाला, तसे नेहमी पांढरे दिसणारे बगळे आपल्या नवीन सोनेरी शेरवानीत पाणवठ्यावर उतरले, दहा-बारा तरी असावेत. मानेवर अन छातीवर सोनेरी पिवळ्या रंगांची पिसं अगदी खुलून दिसत होती. फार कमी काळासाठी ही पिसे रहातात. योग्यवेळी, योग्य गोष्टी करणे ही निसर्गाची खासियत माणसांना मात्र लागू पडत नाही.




नंतर जवळपास अर्धातास पाण्यावर शांतताच होती. रानकोंबड्यांचे आवाज दोन-तीन ठिकाणांहून येणं चालू होतं, पण ते बरेच लांब होते. दोन तरण्या लांडोरी मात्र पाण्यावर येऊन गेल्या. आता हळूहळू दिवस कलायला सुरू झाली. सूर्यास्तानंतर हळूहळू अंधाराचे साम्राज्य यायला सुरुवात झाली. मस्त अशा कातरवेळी गप्पांच्या ओघातच पाणवठ्याकडे नजर टाकली; तर एक काळसर ठिपका पाण्याजवळ फिरताना दिसला. नजरेने होल्यासारखा आकार वाटला म्हणून एकदा लेन्समधून बघितले. आश्चर्य..! आनंद गगनात मावेनासा झाला. ज्या पक्षाबद्दल 'मारुती चितमपल्ली' सरांच्या पुस्तकातून नवेगाव नागझिऱ्याच्या जंगलात कित्येकदा उल्लेख आलेला; तसेच 'किरण पुरंदरे' सर ह्यांच्या 'सखा नागझिरा' या पुस्तकात उल्लेख असलेला,

माझा आवडता पक्षी,'पाचू होला किंवा पाचू कवडा'(Asian Emerald Dove)... होय! तोच होता तो! प्रकाश फार कमी असल्यामुळे कॅमेऱ्याला फोकस करायला अडचण येत होती; पण फोटो मिळाला.

पिंगळे, चट्टेरी वन घुबड (रक्तलोचन घुबड), रानरातवे, मोराच्या केकावलींनी रात्र जागवली; तर रानकोंबडे, मोर, सातभाई, कोकीळ, टोई पोपट, खंड्या यांनी सकाळ गाजवली. साडेपाचच्या सुमारास चांगलेच फटफटले होते. मचाणा लगतच्या वन रस्त्यावरून एक मोर चालत येताना दिसला. त्याच्या आजूबाजूलाच राखी रानकोंबड्यांचा आवाजदेखील येत होता. वनरस्त्यावर कॅमेरा रोखून बसलो; पण रानकोंबडे काही बाहेर आले नाही. तो मोर आपल्या दोन लांडोरींसोबत चालत चालत पाणवठ्यावर आला. वळवाच्या पावसाचे दिवस असल्यामुळे भलताच मूडमध्ये दिसला. दोन्ही लांडोरी त्याच्यावर लक्ष ठेवून असतानाच तो पाण्याजवळ उतरला आणि आपला खजिना म्हणजे पिसारा फुलवला. रत्नपाचुंनी मढवलेल्या आपल्या सौंदर्याने त्या ललनांना रिझवण्याचा तो प्रयत्न करीत होता. सूर्यकिरणे त्याच्या पंखांवर पडून त्याचे सौंदर्य अजून उजळवत होते. निसर्गाचा हा नजारा कॅमेऱ्यात कैद करून, कॅमेरा बाजूला ठेवला आणि उघड्या डोळ्यांनी त्या सौंदर्याचा आस्वाद घेत राहिलो. त्याचं ते लयबद्ध नृत्य, पिसाऱ्यांवर येणारे झंकार, निष्णात नर्तिकेला सुद्धा लाजवतील असेच होते. ते क्षण कॅमेऱ्यात टिपता आले हे भाग्यच!

अनपेक्षितपणे मोरासोबत चालणाऱ्या त्या राखी रानकोंबड्याचा आवाज पाणवठ्या जवळील झाडीतून यायला लागला. आमचा उत्साह शिगेला पोहोचला. सर्व काही परफेक्ट होतं. ठिकाण, सूर्यप्रकाश, अंतर.., सर्वकाही! फक्त झुडपातून त्याच्या बाहेर येण्याचाच अवधी! तो आला, आला तो जोडीनेच! पाटलासारखा रुबाब मिरवत सगळीकडे लक्ष ठेवून तो उंचवट्यावरच थांबला. बस्स! तेवढेच पुरेसं होतं. कित्येक वर्षांची इच्छा त्या एका 'फ्रेम'ने पूर्ण झाली. त्याच्या सहचरणीला बघतांना, लुगडे नेसलेल्या तरुणीची आठवण आली. लचकत मुरडत ती इकडे तिकडे फिरत होती. पाणी पिण्यासाठीसुद्धा ती एकटीच आली. पाटील धुऱ्यावर उभे राहूनच बघत होते. मला वाटतं, त्याला आमच्या समोर यायचेच नव्हते; पण स्त्री-हट्टापुढे त्याचे काही चालले नसेल. म्हणून, पाणी पाजण्यासाठी तो तिला घेऊन आला असावा. ती पाणी पीत असताना तो तिच्याकडे बघत राहिला आणि झुडपामध्ये निघून गेला.त्याला साजेशी, अशीच त्याची जोडीदारीण होती. तिचे काही क्षण कॅमेऱ्यात टिपता आले.

शेवटच्या बॉलवर षट्कार मारण्याचा आनंद कधीकधी शब्दांमधून व्यक्त करता येत नाही; पण आजच्यासारखं समाधान मिळायला भाग्य लागतं, हे मी नक्कीच म्हणेन! सकाळी सात वाजता आम्ही मचाणावरून खाली उतरलो. आजूबाजूला पक्ष्यांची रेलचेल होती. हिरव्यागार वनराईत पिवळाधमक असा बुरखाधारी हळद्या (Black-hooded Oriole) दिसला. बॅकग्राऊंडच्या रंगसंगतीत फार उठून दिसत होता,तो! पक्षी-विश्वातल्या या काही संस्मरणीय आठवणींसह अनुभव-समृद्ध होऊन आम्ही जंगलाबाहेर पडलो.




या क्यू आर कोड ला नवेगाव नागझिऱ्याच्या जंगलातील स्कॅन करून मोराचा आणि राखी रानकोंबड्यांचा व्हिडीओ आपण युटयूब वर बघू शकता.

*****



## स्मृतीसुगंध

२६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन,अमरावती (२०१३) या संमेलनात छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले होते. तेव्हा महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सरांसमवेत प्रदर्शनातील फोटो बघताना महाराष्ट्र पक्षिमित्र संपादक किरण मोरे यांची चितमपल्ली सरांशी पहिली भेट झाली. 'कारुण्यकोकीळ'च्या पिल्लाला 'जांभळ्या पुठ्ठ्याचा सूर्यपक्षी (शिंजीर)' या पक्ष्याची नर-मादी घास भरवतात असे ते दृश्य होते. चितमपल्ली सर त्या फोटोजवळ घुटमळले. त्यांनी मोठ्या बारकाईने त्याचे निरीक्षण केले



# अरे ! आवाज... कुणाचा !



**किरण मोरे**
संपादक, महाराष्ट्र पक्षिमित्र
अमरावती

जंगलाला लागून मोठे पठार,सपाट मोकळ्या मैदानासारखा बराचसा भाग, मैदानावर खुरटी वनस्पतींची, ही रेलचेल ! रानतुळस , तरोटा, काही बाभळी, पळस, हिंगणबेट सारखी मोठी झुडूपे. छोट्या झुडुपां सारख्या सर्वत्र पसरलेल्या शेकडो प्रकारच्या वनस्पती, गवत, झाडे ! या जागेला नाव काय बरं द्यावं? काहीही दिल्याने, मला आवडणाऱ्या माझ्या ठिकाणाचे महत्त्व थोडीच वाढणार अथवा कमी होणार आहे. सकाळच्या त्या सोनेरी उन्हात 'ॲशी'ला (ॲशी-क्राऊन स्पॅरो लार्क) आपला रहाता परिसरही सोन्यासारखा भासत होता. तेवढ्यात समोरच्या रस्त्यावरून एक ट्रक भरधाव जातो, त्याच्या हॉर्नने ती दचकते. स्वगतातून बाहेर येत आपण बराच वेळ आपल्या मैत्रीणीची वाट बघत असल्याची तिला आठवण होते.

'चल, लवकर, उशीर होतोय. तेवढ्यात आलेल्या मैत्रिणीला ती कंटाळून म्हणते.'

'हो, आलेच. घरून लवकर निघणे म्हणजे कठीणच आहे. सकाळची खाण्यापिण्याची घाई असते ना!'

'मला तरी कुठे माहीत होते, वेळेवरच कळले,गुरुजींनी विशेष सभा ठेवली आहे म्हणून ! '

गुरुजींचे रहाणे अजूनही जंगला जवळच असते का? रस्त्याने उडताना तिची मैत्रीण विचारते.

'पूर्णपणे जंगल नाही. लागून शेतीचा परिसर आहे भरपूर. हे बघ, आपण पोहचलो. तो शेजारच्या गावात जाणारा रस्ता दिसतोय ना! त्याच्या बाजूचे ते छोटे पठार.' ॲशी वरूनच दाखविते.

'बापरे! आज तर आपल्या समाजाचे सर्वच हजर दिसत आहेत.' एका दगडा समोरील गर्दीत उतरत दोघीजणी पुटपुटतात.

'हेच! याच्याच बद्दल मी जीव तोडून सांगत असतो. आपण चिमणीच्या आकाराचे, रंगाचे दिसत असल्याने, कुणी आपल्याला ओळखण्याच्या फंदातच पडत नाही.' दगडावरील 'सिंगीग बुशलार्क,' समोर जमलेल्या सर्व लार्क प्रजातीच्या मंडळीना पोटतिडकीने सांगतो.

'आपण लार्क आहोत. या समृद्ध अशा माळरानावरील चंडोल! आता, या ॲशी क्राउन स्पॅरोला पहा.' नुकत्याच उतरलेल्या 'ॲशी' महिलांकडे पाहत 'सिंगीग' म्हणतो.

'जरी मादी पूर्णपणे चिमणीसारखी दिसत असली; तरी तोंडापासून पोटापर्यंत काळा असलेल्या नराचे वेगळेपण जाणवत नाही कां? आणि हो ! साईक्स लार्क'च्या डोक्यावरील टोकदार तुरा पण यांना दिसत नाही का? ओरीएंटलला पण असतो की, एक छोटासा तुरा.' साऱ्या 'ॲशी' महिला लगेच स्वत:ला ठाकठीक करत आपल्यापेक्षा आकर्षक दिसणाऱ्या नराकडे कौतुकाचा कटाक्ष टाकत आपापसात पुटपुटतात. सभेत ओरीएंटल स्कायलार्कला आपले पंख उंचावताना पाहून त्याच्याकडे इशारा करीत, त्यातली एक म्हणते, नाही, त्याच्यासाठी नाही. मला एक विचारायचे होते.

'हं, विचार.' 'सिंगिग बुशलार्क' संमतीपूर्वक म्हणतो.

हेच की, इंग्रजी नावच का? आपण मराठी किंवा इंडिअन नाव का नाही वापरत?'

'अरे, पूर्वी इंग्रजांनी दिली ती नावे म्हणून.'सिंगीग' म्हणतो. आमच्या तर नावातच इंडिआ आहे. इंडिअन बुशलार्क ने दुसऱ्याला म्हटलेले वाक्य सिंगीगला लगेच ऐकू जाते.'

'अरे बाबा, ते पण इंग्रजांनी ठेवलेलेच. तसे मराठीतही छान नाव आहे की तुला - लालपंखी चंडोल! तू उडतोस तेव्हा पंखावर छान विटकरी रंगाचा पट्टा दिसतो, म्हणून ते नाव ! आणि साईक्स नावाचा एक मोठा संशोधक होता, त्याच्या नावावर आहे, आपला साईक्सचा चंडोल; आणि त्यांनी का म्हणून नाही ठेवावीत, नावे ! त्या मंडळींनी भारतात संशोधनही केलं आहे. त्याचं कसं आहे; की आपल्याला 'ग्लोबली' व्हायचे असल्यास ही कॉमन नावं वापरावीच लागतील. तसा,'रुफस-टेल्ड लार्क' आपल्या सगळ्यांपेक्षा मोठा दिसतो, रंगाने विटकरी, आकाराने चिमणीच्या दुप्पट, म्हणून सहज ओळखूही येतो. मात्र, एवढा अपवाद सोडला तर आपल्यात सगळा गोंधळच भरलेला आहे.

'आता माझेच घ्या. सिंगीग बुशलार्क, हे नाव; पण आवाजावरून, गाण्यावरून ओळखणे महाकठीण. मोठे मोठे पक्षीनिरीक्षकही गोंधळतात. त्यात आता माझे 'हॉर्सफिल्ड लार्क असे नविन नामकरणही केले आहे.'

'सिंगीग घोड्यावर बसण्याची नक्कल करीत सांगतो.'हे नाव जरा डॅशिंग वाटते.' गर्दीतून दोघे तिघे लार्क सिंगीगच्या प्रसंशेचा सूर आळवतात.

'नाही.पण, मला जुनेच आवडते. तसेपहाता, धन्यवाद म्हणावे लागेल, त्या 'ई-बर्ड' वेबसाईटला, की त्यामध्ये माझी दोनही नावे दिसतात.असो! मी आज सगळ्यांना इथे कशासाठी बोलावले ते ऐका.'

सर्वांचे लक्ष आपल्याकडे आहे हे पाहून 'सिंगींग' पुढे सांगू लागतो. दिवसेंदिवस आपले ग्रासलँड, म्हणजे माळरानाचा अधिवास कमी होत आहे. आपल्या केंद्रीय सत्तेत मोरासारख्या रंगीत पक्ष्याने राष्ट्रीय पद भूषविल्यामुळे आपल्यासारख्या मळकट रंगाला कोणी वाली राहिला नाही. आपण दुर्लक्षितच रहाणार. राष्ट्रीय स्तरावर माळरानाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विदर्भातून केवळ ग्रेट इंडियन बस्टार्ड व लेसर फ्लोरीकनला ही संधी मिळाली होती. पण, त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी राहिली आहे. एक आतली बातमी सांगतो; जीआयबीचा पक्षच पूर्ण नामशेष होणार आहे म्हणे ! पूर्ण विदर्भात, दोन राहिले आहेत फक्त! ते पण, चंद्रपूरजवळच्या भागात कधी-कधीच दर्शन देतात. निव्वळ देखणेपण आणि कमी संख्या ही काही नेतृत्व करण्याची संधी नाही. आपल्या, वंचीतांच्या मोठ्या संख्येलापण न्याय मिळाला पाहिजे. आपण देखील नेतृत्व करू शकतो, नाही का? म्हणूनच आपल्या माळरानाचे संरक्षण करण्यासाठी आपला आवाज राष्ट्रीय स्तरावरच्या पक्ष्यांमध्ये पोहोचला पाहिजे, असे मला वाटते.

'आपल्या प्रजातीमधील स्थलांतरीतांच्या बोजाचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर उपस्थित झाला तर !' गर्दीतून कुणीतरी लार्क शंका काढते. त्यांचा कसला प्रश्न. ग्रेटर शॉर्ट-टोड लार्क फक्त हिवाळ्यात येतात आपल्याकडे आणि ऑक्टोबरमध्ये येऊन परत मार्चमध्ये जातात, हिमाचलवासी आहेत, तसे ते! हिवाळ्यात तिथे हिमवृष्टी होते म्हणून खाण्याच्या कमतरतेमुळे ते सहा महिने आपल्याकडे आश्रय घेतात आणि आपल्यासारखेच गवताच्या बिया खाऊन गवत प्रजातीचा प्रसार करतात, हे सोयीस्कररीत्या विसरले जाते. त्यांच्या थव्याला बरेचजण ओळखूही शकत नाहीत. अगदी चिमण्यांचा थवा समजतात. आता मला सांगा एखाद्या तळ्याकाठी गवतात चारशे पाचशे संख्येत कधी चिमण्यांचा थवा दिसतो का? ते ग्रेटरच असतात. आपले हिवाळी पाहुणे. त्यात ह्युम्स लार्क पण असतात कधी-कधी.'सिंगींग' शंका निरसन करतात. तिच्या चोचीच्या टोकावर काळा ठिपका आणि छोटा तुरा असतो. दोन-तीनच्या प्रमाणातच असते ती. ओरीएंटल उत्साही होऊन सांगतो. तुला बरीच माहिती दिसते, ह्युम्सची!' 'सिंगींग' विचारतो.

'हो! आमची गाठभेट होते बरेचदा, तलावाशेजारी! आमचा एरिआ तिथून जवळच पडतो ना !' ओरीएंटल प्रांजळपणे कबूल करतो.

'आता पहा स्थलांतरित लार्कमधले कुणी इथे संसार थाटत नाही. बऱ्याच पक्षी प्रजाती पिलांना जन्म देण्यासाठी स्थलांतर करतात. त्यांची पिले पुन्हा आपल्या राज्यात, देशात परत जातात.त्यांच्या,इथल्या संसाराने कुणा राज्याच्या पक्ष्यांवर भार पडत नाही. आणि फक्त तसा विचार केला; तर कोकीळ आहेच की! तसे, त्यांच्या मधल्याच तीन प्रजाती अश्या आहेत; की त्या स्थलांतर करून येतात, दुसऱ्याच्या आयत्या घरट्यात अंडे घालतात आणि मग, झाले त्यांचे काम फत्ते ! मग बिचारा तो घरटेवाला, ते पिलू मोठे होईपर्यंत त्याचा सांभाळ करतो. त्याला किती भुर्दंड पडतो. पण, कुक्कुची (कोकीळ) पिलेही परत आपल्या मायदेशीच जातात, इथे नाही थांबत. इति सिंगींग.

हो, पण पाईड कुक्कु आफ्रिकेहून इथे येतो. त्याची पिले मोठी झाल्यानंतर तिथेच परत त्याच पत्त्यावर बिनचुकपणे जातात. हे कसे? इंडिअन बुशलार्क पंखाने आपले डोके खाजवत विचारतो. हं..!

'प्रश्न तर तुझा बरोबर आहे; पण याचे उत्तर खूप मोठे व किचकट आहे. मी फक्त ढोबळमानाने सांगतो. सभोवताली हे जे ब्रह्मांड आहे नां, त्यापासूनच आपले हे शरीर बनले आहे. म्हणजे तारे, ग्रह, स्टारडस्ट यांच्यापासून; बरोबर! या स्टारडस्टमध्ये एक चुंबकीय शक्ती असते; तशी ती आपल्या शरीरातही असतेच ! तीच चुंबकीय शक्ती साद-प्रतिसाद देऊन ताऱ्यांच्या मदतीने त्याला त्याच्या पत्त्यावर पोहोचती करते. आणि त्याच्या डीएनएमध्ये तो पत्ता असतोच नां पिढीजात, समजलं !' सिंगींग समजावून सांगतो.

'अहो, गुरुजी तुम्ही पुन्हा मुद्द्यावरून भरकटले.फ

रुफस त्यांना आठवण करून देतो. अरे हो ! आपण ओळखीबद्दल बोलत होतो. तर आपली ओळख आपण गायनाद्वारेही सिद्ध करू शकतो. तसेही, आपण स्वत:ची आणि आपल्या घरट्याची सीमा निश्चित करण्यासाठी गातोच. विशेष करून, आपल्या जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी! तेव्हा आपल्या सायरिंक्सला हार्मोन्सचा पुरवठाही जास्तच होतो म्हणा! त्या जोशाच्या भरात तीन चार स्वर, एकादमात काढून आपण गातो. आपल्या नोट्सही प्रतिसेकंद पन्नास-साठपर्यंत असतात. आणि मी हे हातचे नाही लावत आहे. पक्षीसंशोधक 'पामेला रासमुसेन'च्या पुस्तकात सगळ्यांचा स्पेक्टोग्राम आहे. पाहून घ्या, हव तर!' मित्रांनो आपल्या लार्क प्रजातीमध्ये आवाज काढताना वेगवेगळ्या लकबीसुद्धा आहेत. त्यावरूनही चांगली ओळख होऊ शकते. हा इंडिअन आवाज करीत पंख फैलावतो. आणि एखाद्या पॅराशूटसारखा खाली उतरतो. ॲशी, सी..ई..ई. अशी लांब शिटी वाजवत खाली सूर मारतो आणि पुन्हा झपकन वर येतो. अर्थात, या तुमच्या तऱ्हा, स्टाईल्स आहे. पण मला कमाल वाटते ती साईक्सची! तो दोनशे फुटावर जाऊन त्याच्या प्रेयसीसाठी गाणे म्हणतो. सतत पंखाची हालचाल करत वीस मिनिटे विहरत रहाणे हे सोपे काम नाही.

सिंगींग मुद्द्यावर येऊन पुन्हा समजावतो.

आमच्या, ह्यांचा रेकॉर्ड तर बावीस मिनिटाचा आहे.

मागे बसलेली साईक्स-मादी दुसरीच्या कानात कुजबुजत पुढे म्हणते,

तसे, आणखी तिघे हवेत गाणे म्हणत होते. मी फक्त जमिनीवरून कोण किती वेळ गाणे म्हणतो, ते ऐकत होती!

अय्या, हो का !

जवळचीच एक साइक्स-मादी आश्चर्य व्यक्त करते.

हो, तर ! हे जेव्हा खाली माझ्याजवळ आले; ते थेट चोचीत अळी घेऊनच !

' मग तू होकार दिला का ?'

'छे! मी कुठे एका अळीने इम्प्रेस होणार. मग दुसरा आला होता, दोन अळ्या घेऊन. थोड्या वेळाने तिसरा ! पण, ह्यांनी आणल्या त्या एकाच वेळेस चार-चार अळ्या. मग काय ! तो सीजन मी त्यांच्यासोबत फिक्स केला. साईक्स-मादी मैत्रीणीला हसत टाळी देते.

'शूऽऽऽ, मागे बसलेल्या साईक्स-महिला गप्पा नका मारू !'

सिगिंग त्यांना थोड रागावल्यासारखे करत म्हणतो,'

आता जंगलात, माळरानावर आहात; तर छान बोलता, गाता येतं आपल्याला! पण, तुम्हाला माहीत आहे, शहरात बोलणेच काय; तर गाणेसुद्धा एकाचे दुसऱ्यापर्यंत पोहोचत नाही. ध्वनी-प्रदूषणच तेवढे आहे. त्यामुळे, तिथल्या सगळ्या पक्ष्यांना आपला आवाज वाढवावा लागतो, याचा किती ताण येतो त्यांच्यावर! मनुष्य प्रजातीला याचा काहीच अंदाज नाही. शहराच्या कोलाहलात गायला एवढा त्रास होतो, की तिथे विशिष्ट कॉलचे तर विचारूच नका.'

'हो ना! अशा ठिकाणी संसार करणे कठीणच आहे. इंडिअन बुशलार्क-महिला 'ॲशी'ला सांगते.

तुम्हाला तर माहीत आहे. आमचे घरटे जमिनीवर गवताने बनवलेले कॅनोपीसारखे असते. आम्ही दोघेही पिलांना भरवतो. ती थोडी मोठी झाली की बाहेरूनच खाण्याचं पहातात. खाण्याचं झाल, की आम्ही एक कॉल करतो. आणि आमची पिल्ले आपले डायपर...'

'तुम्ही डायपर वापरता ?' ॲशी तिला मध्येच अडवीत विचारते.

'फिकलसॅक ग!' आमची शहाणी पिल्ले आमच्या एका कॉलवर ती बाहेर आणून टाकतात. मग ती फिकलसॅक आम्ही घरट्यापासून बारा पंधरा फुटावर नेऊन टाकतो. एकप्रकारे आमचा हा, होम सॅनीटाईज कॉलच आहे.

'अरे वा! छान आहे तुमचे सॅनीटाईज सिक्रेट. ॲशी, आश्चर्य व्यक्त करते.

कसले सिक्रेट? किरण मोरे आहे न अमरावतीचा. त्याने दोन वेळा गुपचुप व्हिडीओ काढला आमच्या या कॉलचा. 'त्यांचे तर पुस्तक पण आहे नां, आपल्या प्रजातीवर!

हो, 'माळरानावरील चंडोल' नावाचे! तशी, सहा वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय डॉक्युमेंट्री पण त्याने केली आहे; प्रसिद्ध आर्टीस्ट निनाद अभंग आणि महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष जयंत वडतकर यांच्या मदतीने, आपल्यावर 'ॲशी अधिक विस्ताराने माहिती देते.

छान होती त्यात आपली माहिती आणि आपल्यासारखे दुर्लक्षीत लार्क लाईमलाईटमध्ये आले तेव्हापासून.' 'इंडिअन' तिला दुजोरा देते. म्हणुनच तर, दुर्लक्ष केले त्याच्यावर. नाहीतर कोर्टातच नसते का खेचले !

इंडिअनच्या या वाक्यावर तिघीही हसतात.

बर! जरा ऐकु या तर, आपले गुरुजी कुठेपर्यंत आले ते. आपले हसणे दाबत त्यातली एकजण म्हणते.

रुफसचे आवाज आणि गाणे गोड असते. त्याचे गाणे हे प्रश्नोत्तराच्या स्वरूपात असते. लावणीमधील सवाल-जवाबासारखे ! यांच्यात पाच सहा नरांची गायन स्पर्धा मी पाहिली आहे. अर्धा तास चालली होती ती! सिंगीग गुरुजी माहिती देत असतो.

'हो, आम्ही केवळ उन्हाळ्याच्या सुरुवातीला, रुफस समाजाच्या विवाहासाठी त्या स्पर्धा आयोजित करतो, रुफस उत्साहित होत म्हणतो.

तुमचे पण सांगा ना गुरुजी. तुम्ही रॅप फार चांगला करता म्हणे! ' इति ॲशी.

'तसे काही नाही. माझे गाणे जरा उंच म्हणजे वरच्या पट्टीतील व एक सलग आहे. फक्त मध्ये-मध्ये, मी त्यात संवादा सारखे काही आवाज पेरतो.' ॲशीच्या विचारण्यावर सिंगिंग जरा संकोचाने म्हणतो.

'पण,आपल्या गायनाची भुरळ मनुष्य-प्रजातीलादेखील पडली होती. कोकीळ, मैना, यांसारखे गाणारे लार्कपण पाळत होते ते. इतिहासात नोंदी आहेत, तश्या!

'म्हणूनच तुम्हाला 'गायक चंडोल' या नावाने पण ओळखतात.' ॲशीच्या या बोलण्यावर, सिंगीग हसून काही उत्तर देणार, तेवढ्यात एक अनोळखी लार्क वरून लगबगीने गर्दीत उतरत थेट सिंगीगच्या जवळ जाऊन पोहोचतो. त्यांचे कुजबुजणे पाहून प्रकरण काहीतरी गंभीर असल्याची कुणकूण लार्क बंधूंना लागते. बोलतांना मध्ये-मध्ये सिंगीग आकाशाकडे बघत असतो. सर्वांच्या रोखलेल्या प्रश्नार्थक नजरेचे समाधान करण्यासाठी तो बोलतो.'

'मित्रांनो, आताच आलेल्या माहितीनुसार आपल्यावर मनुष्य प्रजातीकडून सॅटेलाईटद्वारे पाळत ठेवली जात आहे. तेव्हा, ही सभा आपल्याला पुढल्यावेळी एखाद्या निर्जन स्थळी घ्यावी लागेल. सध्यातरी आपल्याला इथून निघावे लागेल. आपल्या विदर्भातल्या सहा प्रजाती मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या पाहून, त्यांच्यात काहीतरी खलबतं नक्कीच चालणार. एक लक्षात ठेवा. आपल्या माळरानाला त्यांच्यापासूनच मोठा धोका आहे. यात त्यांना दोष देत बसण्यातही काही हशील नाही, म्हणा ! शेवटी त्यांच्यात सुशिक्षणाचा अभाव आहेच. केवळ एकारलेले शहाणपण..! आणखी काय ?'

'चला निघूया, नाहीतर अजून एक नविन विषय निघेल गुरुजींचा.' ॲशी टेकऑफची पोझिशन घेत आपल्या मैत्रिणीला म्हणते. पुन्हा भेटू भूर्रर्र.... भूर्रर्र.... लार्कच्या मोठाल्या थव्यांच्या उडण्याचा आवाज माळरानावर निनादतो.



**पंखांचे नृत्य आता थांबले,**
**रंग ते निवळून गेले,**
**एक जीवन दुसऱ्यासाठी संपले,**
**चक्र पुन्हा फिरू लागले ।।**



**प्रशांत निकम**
वन्यजीव छायाचित्रकार
अमरावती




एका निवांत सायंकाळी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावतीच्या परिसरात पक्षी निरीक्षणाला गेलो असता थोडं फिरल्यावर एका जागी अनेक फुलपाखरे व 'वेडा राघू' (ग्रीन बी-ईटर) पक्ष्यांचा अक्खा थवा त्यांना टिपण्यासाठी अत्यंत मनमोहक हवेतल्या करामती करत उडत होता. आपण जर जास्त पुढे गेलो तर ते घाबरून इतरत्र उडून जातील या भीतीने मी मैदानात एका जागी बसून राहिलो आणि निरंतर चालणाऱ्या त्यांच्या त्या मनमोहक हालचाली टिपत बसलो. तितक्यात निळसर-हिरव्या रंगाच्या 'वेडा राघू' ची एक जोडी एका खुरट्या अशोकावर येऊन बसली. त्यातील एकाचे डोळे सतत आकाशात फिरत होते काही तरी शोधत होते. तेवढ्यात एक रंगीबेरंगी फुलपाखरू वाऱ्यावर तरंगत उडू लागले. त्याचे पंख सूर्यप्रकाशात चमकत होते, अगदी एखाद्या स्वप्नासारखे. पण, वेडा राघूसाठी ते सौंदर्य फक्त आहार होते. क्षणाचाही विलंब न करता, पक्ष्याने झेप घेतली. हवेत उडतच त्याने अचूकपणे फुलपाखराला आपल्या टोकदार चोचीने पकडले. मी लगेच कॅमेराची शटर स्पीड ६४० वाढवली. ॲपरचर ६.३ वर ठेवला. संध्याकाळ असल्याने आयएसओ १६०० पर्यंत वाढवून घेतला. त्या दृश्याचा छायाचित्र साक्षीदार होण्यासाठी हे काही क्षण तांत्रिक बाबीमध्ये घालवले. आणि पुन्हा फोटो समाधी लावली. आता एक वेडा राघू फुलपाखराच्या त्या फडफडणाऱ्या पंखांना दाबत, फांदीवर आला. तिथे त्याने फुलपाखराला एक-दोन वेळा फांदीवर आपटले. ते मेले याची खात्री केली. आणि आपल्या जोडीदाराच्या चोचीत हा प्रेमाचा घास भरवला. हा एक नैसर्गिक उपाय होता. फुलपाखराच्या शरीरातील कोणतेही विष, किंवा संरक्षक रसायने निष्क्रिय करण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक होती; यात एक प्रयत्न होता आपल्या जोडीदाराला प्रणयासाठी राजी करण्याचा ! फोटोग्राफीच्या निमित्याने हा प्रसंग मला अनुभवायला मिळाला. जोडीदार पक्षी आता समाधानी दिसत होता. त्याने फुलपाखराला गिळले आणि पुन्हा एकदा शांत बसला, पुढच्या शिकारीची वाट पाहत!


ही एक साधी घटना पण निसर्गातील अन्नसाखळीचं हे एक सुंदर आणि परिपूर्ण चित्र होतं - जिथे प्रत्येक हालचालीला एक हेतू आहे, आणि प्रत्येक जीव दुसऱ्या जीवाशी अन्नसाखळीनं जोडलेला आहे. प्रत्येक सजीव हा दुसऱ्या सजीवावर अन्न, आश्रय, संरक्षण, किंवा प्रजननासाठी काही प्रमाणात अवलंबून असतो. निसर्गात प्रत्येक जीव हा इतर जीवांशी संतुलनामध्ये व अवलंबित्वाच्या नात्यात असतो. जर, एक जीव नष्ट झाला, तर संपूर्ण अन्नसाखळीवर परिणाम होतो. आणि म्हणूनच निसर्गातील जैवविविधतेचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे आणि मोलाचेही!

*****

## टपाल तिकिटांच्या दुनियेत

# लाल मुनिया

**"(Red Munia or Red Avadavat, Estrildaamandava/ *Amandava amandava*).'**



**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

भारतात सात प्रकारच्या मुनिआ सर्वत्र आढळून येतात; त्यापैकी लाल मुनिया व काळ्या डोक्याची मुनिया ह्या पक्ष्यांवर टपाल तिकिटे प्रकाशित झाली आहेत.

लाल मुनिया हा चिमणीहूनही लहान पक्षी आहे. हा पक्षी बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार (ब्रह्मदेश); तसेच भारतात सर्वत्र आढळतो. लाल मुनियाच्या नराचा रंग लाल-गुलाबी व त्यावर पांढरे ठिपके, असा असतो, आणि पोटाचा व शेपटीचा काही भाग काळपट असतो. मादीची चोच, डोळे, आणि शेपटीवरील भाग लाल; तर पाठीचा रंग तपकिरी व त्यावर पांढरे ठिपके, असा असतो. शेपूट गोलसर असते. सुंदर रंगांमुळे हे पक्षी मोठ्या प्रमाणावर पाळले जातात. जलाशयाच्या जवळील ओलसर भागात उंच गवत असलेल्या दलदलीच्या प्रदेशात व त्या भोवतालच्या झुडुपी जंगलात; तसेच बांबूच्या वनात हा पक्षी कळपाने वास्तव्य करतो. गवताचे बी, छोटी फळे व किडे, हे त्याचे मुख्य अन्न आहे. किलबिलाट करणाऱ्या या पक्ष्यांची बाभूळ व अन्य काटेरी झुडुपावरून झटकन उडून, तृणबीज खाऊन, परत झुडुपावर बसण्याची होत असलेली हालचाल मनोवेधक असते.

त्यांचा वीणीचा हंगाम जून ते ऑगस्ट, असा असून हा पक्षी गवताचे गोलाकार घरटे बांधतो; त्यास बाजूला प्रवेशद्वार असते. घरट्याच्या आतून, गवत व पिसे एखाद्या अस्तरासारखी लावलेली असतात. घरटे एखाद्या झुडुपात खोलवर बांधलेले असते. मादी चार ते सात पांढरी अंडी घालते. अंडी उबविणे, पिलांना खाऊ घालणे, स्वच्छता ठेवणे, देखरेख करणे, आदी सर्व कामे नर व मादी मिळून करतात. अशा ह्या सुंदर पक्ष्यावर बांगलादेशच्या टपाल विभागाने-बांगलादेशातील स्थानिक पक्ष्यांवरील तिकिट-मालिकेमध्ये-दहा टका किमतीचे टपाल तिकिट प्रकाशित केले आहे.

काळ्या डोक्याची मुनिया, "(Tri-coloured (Black-headed Munia, Lonchuramalacca).'

हा एक 'एस्ट्रिल्डिड फिंच'पक्षी आहे; जो मूलतः बांगलादेश, भारत, पाकिस्तान आणि दक्षिण-चीनमध्ये आढळतो. प्रौढ पक्ष्याचा रंग डोक्यापासून, गळा व छातीपर्यंत आणि पोटापासून शेपटीच्या आतील आवरण व मांड्यांपर्यंत काळा असतो. छाती व पोटाच्या दरम्यान आणि त्याच्या बाजूने पांढरा रंग असतो. उडणारे पंख तपकिरी असतात, आणि पंखांच्या आतील आवरण, पांढरे ते क्रिम रंगाचे असते.

काळ्या डोक्याची मुनिया हा एक लहानसा पक्षी आहे; जो प्रामुख्याने धान्य व इतर बियाण्यांवर आपली गुजराण करतो. कणसाने भरलेल्या बाजरीच्या शेतावर बाजरीचे कोवळे दाणे खाताना हा पक्षी ठिपकेवाली मुनिया, पांढऱ्या पोटाची मुनिया व सुगरण या पक्ष्यांसमवेत दिसून येतो. तो ओल्या गवताळ प्रदेशात रहातो. नर-मादी दोघेही घरटे बांधण्यात भाग घेतात. घरटे अंडाकृती आकाराचे सैलसर बांधलेले असते, व त्यास एक प्रवेशद्वार असते. घरटे नर व मादीच्या आकारापेक्षा थोडे मोठे असते. ही घरटी मानवी वसतीपासून दूर, पाण्याच्या वरच्या भागात किंवा गवताच्या दलदलीच्या भागात बांधली जातात. मादी एकावेळी सात पांढऱ्या रंगाची अंडाकृती अंडी घालते. नर व मादी, दोघेही अंडी उबविण्याचे काम आळी पाळीने करतात.

अशा या सुंदर पक्ष्यावर श्रीलंका देशाच्या टपाल विभागाने श्रीलंकेतील स्थानिक पक्ष्यांवरील तिकिट मालिकेमध्ये साडे-चार रुपये किमतीचे टपाल तिकिट प्रकाशित केले आहे.







*****

## 'पाण तीरचिमणी' (वॉटर पिपीट) या पक्ष्याची महाराष्ट्राच्या पक्षी-सूचीत भर !



तीर चिमणी (Pipit) या जातीतील प्रामुख्याने दक्षिण युरोपच्या उंच पर्वतीय प्रदेश व पूर्वेकडे आशियातील चीनमध्ये प्रजनन व अधिवास असणारी पाण-तीरचिमणी(Water pipit).

शास्त्रीय नाव-Anthus spinoletta, या पक्ष्याची नववर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजे ०३ जानेवारी २०२५ ला महाराष्ट्राच्या पक्षी-सूचीत भर पडली. हिवाळ्यामध्ये थोडक्या अंतराचे स्थलांतर करणारे हे पक्षी असून भारतात या पक्ष्यांच्या नोंदी ह्या उत्तरेतील जम्मू-काश्मिर, हरियाणा, दिल्ली, पंजाब व उत्तर प्रदेश, तसेच पश्चिमेत राजस्थान व कच्छ-गुजरातमध्ये झालेल्या आहेत. मात्र, महाराष्ट्र व दक्षिणेकडील राज्यात या आधी या पक्ष्याची नोंद झाली नव्हती.



**डॉ. रंजीत चित्रकार**
पक्षिनिरीक्षक, परतवाडा

परतवाडा येथील डॉ. रणजीत चित्रकार या पक्षीनिरीक्षकाने ही नोंद अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या अचलपूर तालुक्यातील 'जांभळा' तलावावर केली आहे.

*****

### ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन
### व
### ३ रे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन

यावर्षीचे ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन, अमरावती येथे, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या यजमानपदाखाली दिनांक १ व २ नोव्हेंबर २०२५ (शनिवार व रविवार) दरम्यान आयोजीत केले जाणार आहे. या संमेलनानंतर दुसऱ्या दिवशी (३ नोव्हेंबर २०२५) इच्छुकांसाठी मेळघाट सफारी व Forest owlet सफारी आयोजीत केली जाणार. संमेलन नोंदणी बाबतची सविस्तर महिती लवकरच वेबसाईट व इतर माध्यमांमधून प्रसिद्ध केली जाईल.

### अंकनिधी साठी आभार

या अंकासाठी, आपल्या महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सभासद व कार्यकारीणी सदस्य **प्रा. निनाद शहा**, सोलापूर यांनी त्यांच्या ७६ व्या **वाढदिवसानिमित्य** रु ७६००/- इतका अंकनिधी पाठवला त्याबद्दल प्रा. निनाद शहा सरांचे मनःपूर्वक आभार.



अमरावती येथील WECS आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे
मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



अहिल्यानगर येथे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे
मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



पक्षिमित्र मंडळ नाशिक व महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे
मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



नागपूर येथे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे मारुती चितमपल्ली यांना
श्रद्धांजली वाहण्यात आली



वर्धा येथे बहार नेचर फाऊंडेशन तर्फे मारुती चितमपल्ली यांनी
लावलेल्या चारोळी वृक्षाजवळ त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



अकोला येथे निसर्ग कट्टा, महाराष्ट्र पक्षिमित्र व वनविभाग तर्फे
मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



मुंबईतील प्रसिद्ध पक्षी व वन्यजीव अभ्यासक, अनेक पुस्तकांचे लेखक संजय मोंगा नुकतेच यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मुंबई येथील त्यांचे सहकारी, मित्र, पक्षी निरीक्षक यांनी त्यांच्या आवडत्या अशा **SGNP** येथे Birding/Nature trail चे आयोजन केले होते. BNHS ACEC येथे त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




लेण्याद्री येथे अरण्य ऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना
निसर्ग मित्र मंडळ व पक्षीमित्र संघटनांच्यावतीने श्रद्धांजली

# 'वेडा राघू' (ग्रीन बी-ईटर)






**प्रशांत निकम**

छायाचित्रकार, अमरावती

मी लगेच कॅमेराची शटर स्पीड ६४० वाढवली. ॲपरचर ६.३ वर ठेवला. संध्याकाळ असल्याने आयएसओ १६०० पर्यंत वाढवून घेतला. त्या दृश्याचा छायाचित्र साक्षीदार होण्यासाठी हे काही क्षण तांत्रिक बाबीमध्ये घालवले. आणि पुन्हा फोटो समाधी लावली. आता एक वेडा राघू फुलपाखराच्या त्या फडफडणाऱ्या पंखांना दाबत, फांदीवर आला. तिथे त्याने फुलपाखराला एक-दोन वेळा फांदीवर आपटले. ते मेले याची खात्री केली. आणि आपल्या जोडीदाराच्या चोचीत हा प्रेमाचा घास भरवला.

Book Post

प्रति,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पण, समता कॉलनी
कठोरा रोड,अमरावती
४४४ ६०४

*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
**संपादक : किरण मोरे**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : **ज्ञानपथ प्रकाशन**
**मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन**